## नागरिकत्व प्रकरणाची सुनावणी २६ मार्च

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :
काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नागरिकत्वाबाबत दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडून उत्तर मागितले आहे. न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २६ मार्च रोजी निश्चित केली आहे.
भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी केंद्रीय गृह मंत्रालयाकडे तक्रार दाखल केली होती, ज्यामध्ये राहुल गांधी यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांना सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये स्वतःला ब्रिटिश नागरिक म्हणून घोषित केल्याचा आरोप करण्यात आला होता. एप्रिल २०१९ मध्ये गृह मंत्रालयाने राहुल गांधींना त्यांच्या नागरिकत्वाबाबत स्पष्टीकरण मागणारे पत्र पाठवले होते.

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

* वर्ष ५० * अंक २३८ * * अमरावती * शुक्रवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

अग्राग्रलेख
**खरीखरी..**

## मोदीजींची सरळ रेखा

गेल्या वर्षभरात ज्या ज्या राज्यांच्या निवडणुका घेतल्या गेल्या. त्या ठिकाणी पंतप्रधान मोदी यांनी एकमेव महाराष्ट्र वगळून सर्वत्र नवे चेहरे दिलेले आहेत. भारतीय जनता पक्षाचे हेच वैशिष्ट्य आहे. जे त्यांना इतरांपासून वेगळे बनवते. आपल्या देशातील अनेक पक्ष विशिष्ट व्यक्तीच्या नावाने ओळखले जातात. मग तो उत्तरेचा समाजवादी पक्ष असो किंवा दक्षिणेचा द्रमुक असो. दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून अरविंद केजरीवाल यांचे नाव पक्के होते. आतिशी फक्त रिकामी जागा भरण्यापुरत्या मुख्यमंत्री झालेल्या होत्या. दिल्लीला यापूर्वी भारतीय जनता पक्षाच्या सुषमा स्वराज, काँग्रेसच्या शीला दीक्षित, आम आदमी पक्षाच्या आतिशी या तीन महिला मुख्यमंत्री म्हणून लाभल्या. पैकी सलग पंधरा वर्ष मुख्यमंत्रीपद सांभाळणाऱ्या एकमेव शीला दीक्षितच होत्या. मोदी साहेबांच्या नेहमीच्या शैलीप्रमाणे कालपर्यंत गुप्त असलेल्या रेखा गुप्ता प्रकट झाल्या. त्या पहिल्यांदाच निवडून आलेल्या आहेत हे विशेष. भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून त्या भाजप वतुर्ळात चांगल्याच परिचित होत्या. माजी मुख्यमंत्री साहेब सिंग वर्मा यांचे सुपुत्र प्रवेश वर्मा हे खरं तर सुरुवातीपासूनच मुख्यमंत्री पदाच्या रांगेत आघाडीवर होते. तरीही जे आघाडीवर असतील त्यांची निवड नक्की होईल, अशी पक्की खात्री कोणालाच नव्हती. त्याप्रमाणेच न झालेल्या मुख्यमंत्र्यांनी म्हणजेच प्रवेश वर्मा यांनी गुप्ता यांचे नाव सुचवले आणि त्या मुख्यमंत्री झाल्या. 27 वर्षापासून दिल्लीची सत्ता भारतीय जनता पक्षाच्या हाती नव्हती. संपूर्ण देशात भारतीय जनता पक्ष जिंकला. पण राजधानी दिल्ली केजरीवाल यांनी आपल्या मुठीत घट्ट पकडून ठेवली होती. गेल्या वर्षापासून केजरीवाल यांचा काटा कसा काढावा, याची आखणी करण्यात येत होती. आता केजरीवाल यांचा वारू धावण्याचे थांबले. संघाच्या अंतर्गत पातळीवरील अत्यंत महत्त्वाची कार्यकर्ती म्हणून रेखा गुप्ता यांच्या हाती सत्तेचा शीशमहल देण्यात आलेला आहे. आज रामलीला मैदानावर रेखाताईंना मुख्यमंत्री पदाचा साज चढवण्यात आला. 77 पैकी 48 जागा जिंकून भारतीय जनता पक्षाने दिलेल्या नवा चेहरा दिलेला आहे. प्रवेश वर्मा उपमुख्यमंत्री आहेत. इतर सहा मंत्र्यांनाही शपथ देण्यात आली. आता दिल्लीची महापालिका आम आदमी पक्षाच्या हातून कशी काढता येईल, याची तयारी करण्यास सुरुवात झालेली आहे. अरविंद केजरीवाल यांचा कार्यकाल केंद्र विरुद्ध राज्य यांच्यातील सत्ता संघर्षाचा कालावधी होता. अरविंद केजरीवाल यांनी स्वच्छ प्रशासनाचा नारा दिला होता. पहिल्या कार्यकाळात केजरीवालांनी जनतेला दिलेली आश्वासने त्यामध्ये आरोग्यसेवा, शिक्षण सुधारणा, मोफत वीज, मोफत पाणी वगैरे बऱ्यापैकी समाधानकारक सुरू होते. त्यानंतर मात्र केजरीवाल यांना दारू न पिताही फक्त दारूच्या वासानेच चीत करण्यात आले. आता भारतीय जनता पक्षाचे नायब राज्यपाल आणि भाजपचे सरकार त्या दोघांचेही मेतकूट दिल्लीच्या जनतेला लाभप्रद होईल. अशी अपेक्षा करायला हरकत नाही. रेखा गुप्ता पहिल्यांदाच आमदार झालेल्या असल्या. तरी त्यांनी राजकीय व्यवस्थेचा अनुभव चांगलाच अवलोकन केलेला आहे. मुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्यावर आता त्यांना बरीच साफसफाई करावी लागेल. मोदीजींनी आश्वासन दिल्याप्रमाणे ज्या योजना सुरू आहेत. त्या बंद करण्यात येणार नाहीत आणि जी फुकटेगिरी आहे. त्यात प्रमाणापेक्षाही वाढ होणार आहे. मोदीजी ज्याला 'रेवड्या' म्हणतात. त्या पुढेही सुरू ठेवणे, दिल्लीतील निवडणूकी पूर्वीच्या वचनबद्धतेमुळे आवश्यक झालेले आहे. विधान सभेच्या निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रात, जो जे वांच्छील तो ते लाहो अशा छापाच्या अनेक घोषणा करण्यात आल्या होत्या. सध्या मात्र महाराष्ट्रा सारख्या श्रीमंत राज्यालाही ती दिलेली वचने कशी पाळावी, याची ददात पडली आहे. महानगरी मुंबई श्रीमंत राज्य आहे असे म्हणतात. मुंबई अर्थनगरी आहे, सिनेनगरी आहे. त्यासह अनेक नगऱ्या या मुंबई महानगरीत आहेत. दिलेल्या घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी काय-काय करावे लागते. त्याचा अनुभव सध्या आपले महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी घेतच आहेत. त्या मानाने दिल्ली हे छोटे राज्य आहे. पण दिल्लीची श्रीमंती मुंबईपेक्षा अजिबात कमी नाही. राजधानीच्या या शहराला नवे रूप देणे, जनतेला नवा विचार देणे. आम आदमी पक्षाबरोबर मुकाबला करणे, दिलेल्या घोषणेच्या योजना पूर्ण करणे असा चौफेर विकासाचा मार्ग आता पत्करावा लागणार आहे. दिल्ली देशाची राजधानी आहे. या राजधानीत चहूबाजूंनी शेजारच्या राज्यांचे अनेक तरुण दिल्लीत दाखल झालेले आहेत. याशिवाय दक्षिणेपासून महाराष्ट्रा पर्यंत, त्यांच्यासोबतच हिंदी भाषिक प्रदेशातून लाखो परिवार दिल्लीत निवास करीत आहेत. आता या दिल्लीला सर्वप्रांतीय, सर्वभाषीय आणि सर्वधर्मीय जनतेला आश्वासक सरकार मिळालेले दिसले पाहिजे. हीच दिल्लीकरांची एकमेव आकांक्षा आहे. मोदीजींनी सरळ रेखा आखून दिली आहे. त्यानुरूप नवीन मुख्यमंत्र्यांना सरकार चालवायचे आहे. दिल्लीच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्री रेखाजींना आमच्या मनापासून भरभरून शुभेच्छा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंना २ वर्षांचा कारावास

**५० हजार रुपयांचा दंड**

## १९९५ च्या प्रकरणात शिक्षा; आमदारकीवर टांगती तलवार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २० :**
राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांना २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.
१९९५ मधील एका प्रकरणात त्यांना ही शिक्षा सुनावण्यात आली. कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला आहे. या शिक्षेमुळे माणिकराव कोकाटेंच्या आमदारकीवर टांगती तलवार आली आहे.
१९९५ मध्ये कागदपत्रांची फेरफार आणि फसवणुकीच्या आरोपांवरून हा निर्णय देण्यात आला आहे.
माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी १९९५ मध्ये माणिकराव कोकाटे यांच्या विरोधात सदनिकांच्या घोटाळ्यांसंदर्भात याचिका दाखल केली होती. आमच्याकडे घर नाही आणि आमचे उत्पन्न कमी असल्याचे सांगून माणिकराव कोकाटे आणि भाऊ सुनील कोकाटे यांनी मुख्यमंत्री निधीतील सदनिका घेतल्याचा आरोप करण्यात आला होता.
याप्रकरणी माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या भावावर भादंवि कलम ४२० (फसवणूक), ४६५ (कृत्रिम दस्तऐवज तयार करणे), ४७१ (बनावट दस्तऐवजाचा उपयोग करणे) आणि ४७४ (सत्यता लपवणे) या कलमांखाली गुन्हा दाखल झाला होता.



३० वर्षांनंतर या खटल्याचा आज नाशिक जिल्हा न्यायालयाने निकाल दिला. त्यानुसार माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनिल कोकाटे यांना २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.
या सुनावणीला माणिकराव कोकाटे स्वतः जिल्हा न्यायालयात हजर होते. जिल्हा न्यायालयाने शिक्षा ठोठावताच माणिकराव कोकाटे यांच्याकडून तत्काळ जामीन मिळण्यासंदर्भात हालचारी सुरू झाल्यात आहेत. त्यांनी जामिनासाठी अर्ज केला आहे.
या प्रकरणामुळे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे अडचणीत आले आहेत. त्यांच्या आमदारकी आणि मंत्रीवर टांगती तलवार आहे. लोकप्रतिनिधीला दोन किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांची शिक्षा झाल्यास त्याचे सभागृहाचे सदस्यत्त्व रद्द होते. तसे झाल्यास माणिकराव कोकाटे यांच्या राजकीय कारकीर्दीला ब्रेक लागू शकतो.

### वरच्या कोर्टात दाद मागणार

न्यायालयाने शिक्षा सुनावल्यानंतर माणिकराव कोकाटे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ३० वर्षांपूर्वी तुकाराम दिघोळे यांनी राज्यमंत्री असताना राजकीय द्वेषापोटी माझ्यावर ही केस दाखल केली होती. आज या केसचा निकाल आला. निकाल पत्र मी अद्याप वाचले नाही. या निकालाविरोधात उच्च न्यायालयात अपील करणार असल्याचे ते म्हणाले.
न्यायालयाने शिक्षा सुनावल्यानंतर मी रीतसर जामीन घेतलेला आहे, असा दावाही माणिकराव कोकाटे यांनी केला. कोकाटे यांच्यावर कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला होता.

# दिल्लीत 'रेखा सरकार'

## मुख्यमंत्री पदाची घेतली शपथ : प्रवेश वर्मासह ६ मंत्री

■ **वृत्तसंस्था नवी दिल्ली, दि. २० :**
शालीमार बाग मतदारसंघातून पहिल्यांदाच आमदार झालेल्या रेखा गुप्ता (५०) यांनी गुरुवारी दिल्लीतील रामलीला मैदानावर शपथ घेतली. त्या दिल्लीच्या नवव्या आणि चौथ्या महिला मुख्यमंत्री बनल्या आहेत.
रेखा यांच्या आधी सुषमा स्वराज, शीला दीक्षित आणि आतिशी मुख्यमंत्री होत्या. या कार्यक्रमाला पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांच्याव्यतिरिक्त, भाजपशासित २१ राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीदेखील उपस्थित होते. आप नेते अरविंद केजरीवाल आणि आतिशी शपथविधीला उपस्थित राहिले नाहीत.
रेखा यांच्याशिवाय ६ मंत्र्यांनीही शपथ घेतली. यामध्ये प्रवेश वर्मा ज्यांनी अरविंद केजरीवाल यांना पराभूत केले, तसेच आशिष सूद, मनजिंदर सिंग सिरसा, रवींद्र इंद्रराज सिंग, कपिल मिश्रा आणि पंकज कुमार सिंग यांचा समावेश आहे.
दिल्लीतील रामलीला मैदानावर झालेल्या शपथविधी सोहळ्याला एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित होते. याशिवाय, पंतप्रधान मोदी, दिल्लीचे नायब राज्यपाल,















### शीशमहालमध्ये राहणार नाही

शपथ घेण्यापूर्वी रेखा गुप्ता यांनी गुरुवारी सकाळी माध्यमांना सांगितले की, 'ही एक मोठी जबाबदारी आहे. माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल मी पंतप्रधान मोदी आणि पक्षाच्या हायकमांडचे आभार मानते. मी कधीच विचार केला नव्हता की मी दिल्लीची मुख्यमंत्री होईन. मी काचेच्या महालात राहणार नाही.

मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि त्यांचे मंत्रिमंडळ व्यासपीठावर उपस्थित होते.
दिल्लीतील रामलीला मैदानावर झालेल्या शपथविधी सोहळ्याला एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित होते. याशिवाय, पंतप्रधान मोदी, दिल्लीचे नायब राज्यपाल, मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि त्यांचे मंत्रिमंडळ व्यासपीठावर उपस्थित होते.
दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत निवासस्थानाचे नाव भाजपने शीशमहाल ठेवले. अरविंद केजरीवाल यांनी ते बांधले होते. केजरीवाल यांनी नियमांचे उल्लंघन करून ते बांधण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केल्याचा आरोप भाजपने केला आहे.

# ४ महिला नक्षली ठार

## हॉकफोर्स व बालाघाट जिल्हा पोलिसांची कारवाई

■ **महासागर प्रतिनिधी गोंदिया, दि. २० :**
मध्य प्रदेशच्या बालाघाट जिल्ह्यात हॉकफोर्स आणि बालाघाट जिल्हा पोलीस दलाला नक्षलवादी कारवायांविरोधात मोठे यश मिळाले आहे.
जंगल परिसरात शोध मोहीम राबविताना ठाणे गढीच्या सूपखार वन परिक्षेत्राच्या रोंडा फॉरेस्ट कॅम्पजवळ हॉकफोर्स, बालाघाट जिल्हा पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत ४ महिला नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे.
मारल्या गेलेल्या ४ महिला नक्षलवाद्यांकडून एक इन्सास रायफल, एक एसएलआर रायफल आणि एक ३०३ रायफल आणि दैनंदिन वापरातील इतर वस्तू जप्त



करण्यात आल्या. मृत महिला नक्षलवाद्यात २० लाखाचे बक्षिस असलेली भोरमदेव एरिया कमेटीची कमांडर आशा, १४ लाख बक्षिस असलेली शीला उर्फ पद्मा उर्फ सरिता, १४ लाख बक्षिस असलेली रंजिता आणि तितकेच बक्षिस असलेली लख्खे मडावी यांचा समावेश आहे.
या चकमकीत काही महिला नक्षलवादी जखमी झाल्या आहेत. चकमकीनंतर घनदाट जंगलाचा फायदा घेऊन ते पळून गेल्याचे सांगण्यात आले. त्यांचा शोध घेण्यासाठी १२ पोलिस पथकातील ५०० हून अधिक पोलिस बळ अजूनही हॉकफोर्स, सीआरपीएफ कोब्रा आणि पोलीस पथकांकडून शोध सुरू आहे.

## जेएनयूमध्ये कुसुमाग्रज मराठी अध्यासन

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २० :**
गेल्या २० वर्षांपासून जवाहरलाल नेहरु विश्वविद्यापीठ अर्थात जेएनयुमध्ये रखडलेल्या मराठी भाषा अध्यासनाचा विषय अखेरीस दिल्लीत होणाऱ्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित संमेलनाच्या निमित्ताने निकाली काढण्यात आला. २७ फेब्रुवारी या कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी जेएनयुमध्ये कुसुमाग्रजांच्याच नावे मराठी अध्यासन सुरू करण्यात येणार असून त्यासाठी १० कोटी रुपये देण्यात येणार असल्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. दिल्लीत होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाची विशेष रेल्वे पुण्याहून रवाना झाली. यावेळी सामंत यांनी ही माहिती दिली.
अध्यासनामुळे एम.ए, पीएच.डी अभ्यासक्रम, मराठी भाषा विस्तार, प्रचार, अभिजात मराठी वाङमय, साहित्य देशभरातील साहित्यिकांना उपलब्ध होइल, असे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

## साहित्य संमेलनासाठी राज्य सरकारकडून अतिरिक्त २ कोटींचा निधी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे सुरू होत असून, या संमेलनासाठी राज्य सरकारने २ कोटी रूपयांचा अतिरिक्त निधी मंजूर केला आहे. विशेष बाब म्हणून राज्य मराठी विकास संस्थेच्या माध्यमातून हा निधी देण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. यासंदर्भातील शासकीय आदेश (जीआर) जारी करण्यात आला आहे.
राज्य सरकारकडून मंजूर केलेला हा निधी फक्त मराठी भाषेच्या प्रचार, प्रसार, विकास आणि संवर्धनासाठीच वापरला जाणार आहे. संमेलन संपल्यानंतर ३ महिन्यांच्या आत अखिल भारतीय साहित्य महामंडळाने राज्य मराठी विकास संस्थेकडे या निधीच्या वापराबाबतचे विनियोजन प्रमाणपत्र, संमेलन अहवाल आणि सनदी लेखापालांकडून तपासलेले विवरणपत्र सादर करणे आवश्यक असल्याचे सरकारने आदेशात नमूद केले आहे.

# दिल्लीत मराठीचा जागर

■ **वृत्तसंस्था नवी दिल्ली, दि. २० :**
मायमराठीचा जागर करण्यासाठी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे २१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ या तीन दिवसांत संपन्न होत आहे.
दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा... ही केवळ कविकल्पना नाही तर आपल्या अस्मितेचा आणि अभिमानाचा विषय आहे, याचा प्रत्यय आपणास या ऐतिहासिक संमेलनातून येणार आहे. भाषा, संस्कृती, राष्ट्रभावना, मानवता आणि एकात्मता यांचा आगळा मिलाफ यानिमित्ताने महाराष्ट्र वा देशातीलच नव्हे, अवघ्या जगातील साहित्यरसिक देशाच्या राजधानीत अनुभवणार आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन सरहद, पुणेच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आले आहे.
दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधान मोदी यांनी निमंत्रण स्वीकारले आहे.
सरहद, पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन २१ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. जेष्ठ नेते शरद पवार या साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी असणार आहेत. संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. तारा भवाळकर असतील तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहतील. जवळपास ७० वर्षांनी पुन्हा एकदा दिल्ली मराठी साहित्य संमेलनासाठी सज्ज होणार आहे.
मराठी साहित्य संमेलन म्हटले की, लेखक, कवी, साहित्यिकांची गर्दी असणारच. सा संमेलनाच्या निमित्ताने सारस्वतांचा मेळा दिल्ली नगरीत भरत असून, महाराष्ट्रासह देशभरातील साहित्यिक, रसिक, मराठीवर प्रेम करणारे दिल्लीत गोळा होवू लागले आहेत. यापूर्वी १९५४ साली दिल्लीला ३७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले होते.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

**९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आज उद्घाटन**

## धनंजय मुंडे यांना 'बेल्स पाल्सी' आजार



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २० :**
बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे अडचणीत सापडलेले राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना बेल्स पाल्सी नामक आजार झाला आहे.
या आजारामुळे मला साधे २ मिनिटेही व्यवस्थित बोलता येत नाही. त्यामुळे मला कॅबिनेट व पक्षाच्या जनता दरबाराला उपस्थित राहता येत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.
उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्षाच्या सर्वच मंत्र्यांना व आमदारांना जनता दरबार घेण्याचे आदेश दिलेत. पण मंत्री धनंजय मुंडे यांनी मागील ६ आठवड्यांपासून एकदाही जनता दरबार घेतला नाही. मुंडे यांनी आपल्याला बेल्स पाल्सी नामक आजार झाल्याची माहिती दिली.

# आयसीसी वनडे रँकिंगमध्ये गिल अव्वल

**पाकिस्तानच्या बाबर आझमला मागे टाकले गोलंदाजांत श्रीलंकेचा तीक्षणा अव्वल स्थानी**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**
भारतीय सलामीवीर शुभमन गिल आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत नंबर-१ फलंदाज बनला आहे. त्याने पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमला मागे टाकले. गेल्या आठवड्यात गिल दुसऱ्या स्थानावर होता. आयसीसीने बुधवारी ताजी क्रमवारी जाहीर केली. गोलंदाजीत श्रीलंकेचा महीष तीक्षणाने अफगाणिस्तानच्या रशीद खानला मागे टाकत अव्वल स्थान पटकावले आहे.
फलंदाजी क्रमवारीत चार भारतीय फलंदाज टॉप-१० मध्ये आहेत. कर्णधार रोहित शर्मा तिसऱ्या आणि विराट कोहली सहाव्या स्थानावर आहे. श्रेयस अय्यरने एका स्थानाचा फायदा घेत नववे स्थान मिळवले आहे.
गिलने इंग्लंडविरुद्ध नुकत्याच झालेल्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या दोन एकदिवसीय सामन्यात अर्धशतके आणि तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात शतक झळकावले होते आणि त्याचा फायदा त्याला मिळाला आहे. त्याने तीन सामन्यात २५९ धावा केल्या. एकदिवसीय क्रिकेटमध्ये गिलने नंबर-१ रँकिंग गाठण्याची ही दुसरी वेळ आहे.



श्रीलंकेचा फिरकी गोलंदाज महीष तीक्षणाने गोलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले आहे. त्याने अफगाणिस्तानच्या रशीद खानला मागे टाकले आहे. गोलंदाजांच्या क्रमवारीत टॉप-१० मध्ये दोन भारतीय आहेत, कुलदीप यादव आणि मोहम्मद सिराज. कुलदीपला एका स्थानाचा फायदा झाला आहे.

# एकनाथ शिंदेंना जीवे मारण्याची धमकी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २० :**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. यासंदर्भात गोरेगाव पोलिस ठाण्यात धमकीचा ईमेल करण्यात आला आहे.
शिंदे यांची गाडी बॉम्बने उडवण्याचा उल्लेख यामध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे आता पोलिसांकडून ई-मेल पाठवणाऱ्याचा शोध सुरू झाला आहे. वास्तविक शिंदे यांना धमकीची ही पहिली वेळ नाही. या आधी देखील त्यांना अनेकदा धमक्या देण्यात आल्या आहेत.



**याआधीही धमक्या**
मला अनेकवेळा अशा धमक्या आलेल्या आहेत. पण मी असल्या धमक्यांचा कधी विचार केला नाही. मी माझे काम करत राहिलो आणि आताही काम सुरू राहणार आहे. आज दिल्ली येथे ते माध्यमांशी बोलत होते. अशा धमक्यांना मी भीक घालत नसल्याचेही ते म्हणाले.

एक महिन्यापूर्वी देखील उपमुखमंत्री एकनाथ शिंदे यांना एका व्यक्तीने धमकी दिल्याचा प्रकार समोर आला होता.
एका २४ वर्षीय तरुणाने एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. याबाबत त्याने सोशल मीडियावर प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला होता. या पोस्टद्वारे त्याने एकनाथ शिंदे यांना धमकी दिली होती. याप्रकरणी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी तरुणावर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी केली होती. हितेश प्रभाकर धेंडे असे या तरुणाचे नाव असल्याचे समोर आले होते.

# शिंदेंच्या निर्णयाची चौकशी होणार!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**
सिडकोच्या जालन्यातील खरपुडी प्रकल्पाच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्री सचिवालयाकडून देण्यात आले आहेत. सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे आता सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकल्पाला मंजुरी दिली होती. मात्र ९०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पावरून आता शिंदे आणि भाजपतच शीतयुद्ध पुन्हा समोर आले आहे. एकनाथ शिंदे यांच्या निर्णयाची चौकशी करण्याचे आदेश फडणवीसांनी दिल्यामुळे त्यांच्या आदेशाचा अर्थ काय? याबाबत आता राज्यात चर्चा सुरु झाली आहे.
जालना जिल्ह्यातील ९०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली होती. याबाबत उद्धव ठाकरे गटाचे माजी आमदार संतोष सांबरे यांनी चौकशीचे पत्र दिले होते. सिडकोच्या जालना जिल्ह्यात खरपुडी प्रकल्पात भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप यात करण्यात आला होता.



या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यामुळे फडणवीस, शिंदे यांच्यातील शीतयुद्ध सुरू असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे.

# मराठी साहित्यात लीळाचरित्राचे स्थान

मराठी साहित्याचा प्रांत अतिशय समृद्ध आणि सशक्त आहे. मराठी साहित्याला दीर्घ आणि प्राचीन अशी परंपरा लाभली आहे. आज इतर भाषांमधील जी साहित्य संपदा आहे त्यामध्ये मराठी साहित्य कुठेही मागे नाही. उलट मराठी साहित्याने आपले भावविश्व अतिशय व्यापक केलेले असून जागतिक साहित्याला तोडीस तोड साहित्य मराठी भाषेमध्ये उपलब्ध आहे.

समाजातील सर्वच अंगांना स्पर्श करण्याचे कार्य मराठी साहित्याने केले आहे. कविता,कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन अशा विविध प्रकारांनी मराठी साहित्य बहरलेले आहे. प्रामुख्याने वैचारिक आणि ललित अशा दोन्ही प्रांतात मराठी साहित्याची मुशाफिरी दिसून येते.

या दोन्ही प्रांतात अतिशय विपलु असे लेखन मराठी भाषेत आढळून येते. मराठी साहित्याचा मागोवा ज्यावेळी आपण घेतो त्यावेळी आपण बाराव्या शतकात जाऊन पोहोचतो. बारावे शतक हे मराठी साहित्याच्या दृष्टीने सुवर्णकाळ होय. याच काळात मराठी साहित्य गंगेचा उगम झालेला दिसून येतो.

मराठीचा पहिला लिखित स्वरुपातील ग्रंथ लीळाचरित्र याच काळात लिहिल्या गेला. गद्य निर्मितीचा पाया या ग्रंथाने घातला. याप्रमाणेच धवळे हे आद्य काव्य देखील याच काळात रचल्या गेले. इथून सुरु झालेला मराठी आणि गद्य आणि पद्य साहित्याचा प्रवास अविरतपणे अद्यापही सुरुच आहे.

मराठीच्या आरंभकाळाला सुवर्णयुग असे म्हटल्या गेले आहे कारण मानवी जीवनाच्या सर्व अंगाला स्पर्श करणारा आद्य ग्रंथ लीळाचरित्र एक मानदंड ठरला. पुढे ज्ञानेश्वरीसारखे महाकाव्य असेल किंवा नरेंद्राचे रुक्मिनी स्वयंवर हे काव्य असेल यांनी मराठी साहित्याला श्रीमंती प्राप्त करुन दिली आहे.

या ग्रंथांचा आदर्श पुढे ठेवतच आजतागायत शेकडो ग्रंथ मराठी भाषेमध्ये निर्माण झाले. महानुभाव साहित्याचे तर मराठी भाषा श्रीमंत करण्यात फार मोठे योगदान आहे. महानुभावांनी मराठी साहित्याला साडेसहा हजार ग्रंथ दिले आहेत. एवढया मोठया प्रमाणात एकाच संप्रदायाने ग्रंथ निर्मिती करावी हे जगाच्या पाठीवर कुठेच घडलेले नाही.

महानुभाव साहित्याशिवाय मराठी भाषेचा इतिहास अपूर्णच राहील. एवढे महत्वपूर्ण साहित्य या संप्रदायाने मराठी भाषेला दिलेले आहे. आधुनिक काळात देखील महानुभाव साहित्याची निर्मिती सुरुच आहे. आधुनिकतेशी महानुभाव साहित्याने जुळवून घेतले आहे.

संशोधनासोबतच आधुनिक काव्यात चितपरिचीत असलेले कथा, कादंबरी आणि काव्य प्रकार देखील महानुभाव साहित्यिक हाताळत असून ते मराठी साहित्याच्या प्रांतात आपला ठसा उमटवित आहेत- असे असले तरी लीळाचरित्राचे मराठी साहित्यात आगळे वेगळे स्थान आहे हे मान्य करावेच लागेल.

लीळाचरित्र ग्रंथ कसा तयार झाला याविषयी अत्यंत उद्बोधक माहिती आहे. श्रीचक्रधर स्वामींच्या प्रयाणानंतर त्यांचे पट्टशिष्य नागदेवाचार्य व इतर भक्तमंडळी रिद्धपूरला श्रीगोविंदप्रभूंच्या सेवेसाठी येऊन राहिले. स्वामीच्या विरहाचे दुःख सर्वांच्याच अंतःकरणात भरलेले होते. नागदेवाचार्य तर श्रीगोविंदप्रभूंची सेवा आटोपल्यानंतर एकांतात बसून स्वामींच्या लीळांचे स्मरण करीत असतं. हे केवळ विरह दुःखाचे ओवले-पोवलेपण नाही. आचार्य कशाचे तरी निरंतर स्मरण करीत असतात. हे चाणाक्ष म्हाइंभटांच्या लक्षात आले.

एके दिवशी त्यांनी नागदेवाचार्यांना विचारले भटोः तुम्ही निरंतर काइसयाचे मनन करीत असा, तुम्हासी केव्हळीही मननावेगळेया न देखोः यावर नागदेवाचार्यांनी उत्तर दिले. मी नेहमी स्वामींच्या लीळा मनन करीत असतो. स्वामींच्या सान्निध्यात मी जेव्हा हिरवळीला होतो, तेव्हा एके दिवशी त्यांनी मला तेथून रिद्धपूरला पाठविले.

मी जायला निघालो, तेव्हा सर्वज्ञांनी मला म्हटले, वानरेयाः एथोनि निरोपीले विचारशास्त्रः अर्थशास्त्रः तयाचे श्रवणः मननः निदिध्यसन करावेः तेही एक स्मरणचि कीं गाः एथीची चरित्रे आठविजेतिः आइकीजेतिः तेही एक स्मरणचि कीं गाः असे निरुपण सर्वज्ञांनी मला त्यावेळी केले होते.

म्हणून त्यावेळी रिद्धपूरला म्हणजे येथे श्रीप्रभूंच्या सान्निध्यात असताना श्रीप्रभूच्या ज्या खेळक्रीडा पाहिल्या त्या सर्वांचे मी निरंतर स्मरण करीत असतो. मी जैलागुनी अनुसरलां तैलागुनी मज देखता जीया सर्वज्ञांचीया लीळा वर्तलीया तीया मी आवांकीतेचि असेः जै मज पवाड नसेः सर्वज्ञांच्या सेंवादास्यालागी कव्हणीकडे जाए तरी जीए भक्ते सर्वज्ञांजवळि असेति त्याते एऊनि पुसेः आन मी अनुसरलां नव्हता तै बाइसादेखत जिया लीळा वर्तलीया तीया मीया सर्वज्ञाते पुसीलीयाः आन सर्वज्ञे प्रसंग परांत नीरुपीले इतिहास तेही आवांकीत असेः आन सर्वज्ञे जे नीरोपीले परावर नीरुपन तेही आवांकीतूची असेः आन अळजपुरीहून सर्वज्ञे बीजे केले तो थौनि




**प्रा. डॉ. किरण वाघमारे**
सहायक प्राध्यापक
९८५०९०२१५४

प्रतिष्ठानापर्यंत जीया लीळा वर्तलिया तीया सर्वज्ञे प्रसंगे भक्तापरिवारात सांगीतलीया तीया आठवीतूचि असेः आन सर्वज्ञे जै एकांकी राज्य केले तीया लीळाः सर्वज्ञे प्रसंगे भक्ताप्रती नीरुपीलीयाः तीयाही आठवितूचि असेः आन सर्वज्ञे द्वापरिचीया लीळाः श्रीप्रभूचीया लीळा प्रसंगे भक्ताप्रति नीरुपीलिया तीयाही आठवितुची असेः

आपण कशाचे मनन करीत असतो याचा वृत्तांत नागदेवाचार्यांकडून ऐकल्यावर दूरदर्शी प्रज्ञावंत म्हाइंभटांच्या मनात एक विचार स्फुरला व तो त्यांनी ताबडतोब बोलूनही दाखविला.

आचार्यांना ते म्हणाले, भटो तुम्हासी सर्वज्ञांचा वरुः म्हणौणि सर्वज्ञे नीरोपीले ज्ञानः शास्त्र ज्ञातः सर्वज्ञे जीया केलीया सांगितलीया तीया तुम्हासि आठवितातिः तरि आता श्रीचरणा सन्निधानी आम्हांसीः आन पुढे जो सर्वज्ञांचा मार्ग होइल त्यासि तवं इतुके शास्त्र न धरेः तरि सर्वज्ञांचिया लीळा तुम्ही सांगा आन मी लीहिनः भटी म्हणीतलेः हो कांः लिहीले मार्गासी उपयोगा जाईलः सर्वज्ञाते मागार्ची प्रवृत्ती असेः कां पाः सर्वज्ञे म्हणीतलेः शास्त्र घेइजेः मग काळे करुनी उपयोगा जायेः

लीळाचरित्राच्या रुपाने स्वामींच्या आठवणी लिहून काढण्याचा विचार ज्यावेळी म्हाइंभटांना स्फुरला तो क्षण मराठी साहित्याच्या दृष्टीने अपूर्व क्षण होता यात शंका नाही. या आठवणी लिहून काढण्याचे प्रयोजन जरी महानुभाव पंथा पुरते मर्यादित असले तरी त्यामुळे महाराष्ट्र, मराठी भाषा व मराठी साहित्य यांची म्हाइंभट व नागदेवाचार्य या दोन्ही पंडितांकडून कशी अनमोल सेवा घडली हे आपणास आज अनुभवाला येते.

पुढे नागदेवाचार्यांनी आठवणी सांगायच्या आणि म्हाइंभटांनी त्या लिहून काढायच्या असे ठरले. मग माहिभटी लेखन आरंभीलेः भट माहीभट वाजेश्वरी वीजन करीतः ऐसे अवघे भटोबासी लीळा कथन केलेः ते माहीभट सा मासा लीहिलेः आणि अशारितीने सहा महिण्यात लीळाचरित्राचा कच्चा खर्डा तयार झाला.

लीळाचरित्राचा खर्डा तयार झाल्यावर त्यातील मजकूर यथार्थ असावा, त्यात कोणतीही चूक किंवा कमी अधिकपणा राहू नये म्हणून ज्या विद्यमान व्यक्तींचा त्यात संबध आला होता त्यांच्याकडून त्या मजकुराची खात्री करुन घेणे आचार्यांना आवश्यक वाटले.

म्हणून म्हाइंभटांना त्यांनी म्हटले, माहीभटो जै मी सर्वज्ञाते अनुसरलां नाही तै बाइसां अवीद्यमान जीया लीळा वर्तलीया तिया तयाचीये अनुभवीचीया तयाते पुसावीयाः जानोचेया अनुभवीचीया जानोते पुसावीयाः नाथोचीये अनुभवीचीया नाथो ते पुसावीयाः येल्होचीये अनुभवीचीया येल्होते पुसावीयाः एये जीयाचाची परी ज्या ज्या ज्याचिये अनुभवीचीया लीळा त्या त्यासि पुसाविया: श्रीप्रभूचा सन्निधानी जे भक्त होते त्याचीये अनुभवीचीया लीळा त्याते पुसावीयाः

मग म्हाइंभटांनी आचार्यांच्या आज्ञेप्रमाणे गावोगावी फिरुन स्वामींच्या लीळा गोळा केल्या व पुन्हा त्या नागदेवाचार्यांना दाखविल्या व शके ११९७ मध्ये लीळाचरित्र हा ग्रंथ तयार केला.

म्हाइंभटांनी लिहिलेल्या लीळाचरित्राची एकच प्रत होती. लीळाचरित्र म्हाइंभटांनी बाळबोध लिपीत लिहिले होते. त्यावेळी त्याच्या प्रतिलिपी तयार केल्या नाहीत. ही प्रत नागदेवाचार्यांजवळ होती.

त्यांच्या निधनानंतर ती बाइदेवबासाकंडे व नंतर कवीश्वरबासाकंडे आली व त्यांच्याजवळ असतांनाच खालशाची धाड आली व त्यावेळी ही आद्य प्रत नाहीशी झाली. सिद्धांते हरिबास व धाकटे सोंगोबास यांच्या अन्वयस्थळात आन तिन्ही रुपेचरित्रे महाइभटीचि केली परि ते लीळासंबंध खालसाचिया धाडीसी नाहीचि जालेः असा स्पष्ट उल्लेख आहे. पुढे लीळाचरित्रावर अनेक पिढीपाठ तयार झाले. हे सर्व पाठ लिपीबद्ध होते.

खालशाच्या धाडीत मुळ प्रत नष्ट झाल्यावर त्याच्या पुनर्लेखनाचे काम प्रथम कमळाइसाची शिष्या हिराइसा हिने केले. हिराइसाला एकछंदी प्रज्ञा होती. त्यामुळे एकदा ऐकलेले तिच्या डोक्यात पक्के बसतं असे. तिने लीळा सांगितल्या व पाटकुले मालोबास यांनी लिहून काढल्या. हे पुनर्लेखनाचे काम शके १२३२ मध्ये झाले.

महानुभावांनी अचाट साहित्य निर्मितीचे काम करुन महाराष्ट्र वाङ्ीय इतिहास समृद्ध केला आहे. महाराष्ट्राबाहेर पंजाब, काश्मीर, उत्तप्रदेश, आंध्रपदेश किंबहुना अफगाणिस्थान, काबुल- कंदहार पर्यंत महानुभावांनी मराठी भाषा पोहोचविली. सोबत महाराष्ट्राच्या संस्कृतीला सर्वदूर नेले.

महानुभाव विचारधारा असलेले साहित्यिक आधुनिक साहित्यात संचार करीत असून ते मराठी साहित्य विश्वाला दमदार साहित्यकृती देत आहेत. याची दखल मराठी साहित्य विश्वाने घेणे आवश्यक आहे. काव्यातील अभंग, गझल अशा प्रकारांचा देखील वापर महानुभाव साहित्यिक करीत आहेत. कलगीतुरा याचा देखील अंतर्भाव महानुभाव साहित्यिकांनी केला आहे.

अशाप्रकारे मराठीच्या आरंभकाळी एक सशक्त आणि परिपूर्ण साहित्य निर्मिती करुन मराठी साहित्य निर्मितीचा पाया घालणाऱ्या महानुभाव साहित्यिकांनी आधुनिक काळात देखील आपली साहित्य निर्मिती सुरुच ठेवली असून महानुभावीय विचारधारेच्या ग्रंथ निर्मितीसोबतच इतरही अनेक ग्रंथांची निर्मिती करुन आपली देखील नाळ आधुनिक साहित्यासोबत जुळलेली आहे हे दाखविण्याचा एक उत्तम प्रयत्न या साहित्यिकांनी केला आहे. भविष्यात हा प्रवाह अधिक जोमाने प्रवाहित होत जाईल यात कुठलीच शंका नाही.

●●●●●●●●●

# सारस्वती जन्मभू : आदिपर्व



दक्षिण हिंदुस्थानातील सर्वात प्राचीन देश म्हणून विदभार्चे नाव घेण्यात येते. रामायण, महाभारत, रघुवंश आदी प्राचीन ग्रंथांमधून विदर्भाचे संदर्भ येतात. कवी राजशेखरने 'सारस्वती जन्मभू' म्हणून या भूमीला प्रशस्तिपत्र बहाल केले आहे. मराठी भाषेची जननी म्हणूनही तिचा उल्लेख करण्यात येतो.

काळ कुणासाठी थांबत नाही. गतकाळाची पुनरावृत्तीही होत नाही. या काळाच्या विशाल पडद्यावर अनेक ऋषिमुनी आणि लेखक कवी आपल्या शब्दांची अक्षरनोंद ठेवून व आपले अस्तित्व चिरंजीव करून पडद्याआड निघून जातात. वाचकांच्या हाती उरतो तो या आठवणीतील अक्षरांचा अमोल ठेवा...

विदर्भाच्या सुवर्णाक्षरांतले एक पान इंद्रपुरीचे आहे. एके काळची संपन्न आणि विख्यात नगरी म्हणजे इंद्रपुरी म्हणजेच अमरावती. तिच्या प्राचीनतेच्या खुणा आज जागोजागी आढळतात. ऋग्वेदातील काही सूक्तांचा द्रष्टा आणि आर्यपुरुष अगस्ती ऋषी यांची पत्नी विदर्भ राजकन्या लोपामुद्रा, नळराजाची राणी दमयंती, श्रीकृष्णाची पत्नी रुक्मिणी आणि दशरथ राजाची आई इंदुमती येथल्याच मातीत जन्मल्या. या चारही विदर्भकन्यांचा इतिहास अमरावती जिल्ह्यातल्या चांदूर तहसीलीतील 'कौडिंण्यपूर' या एकेकाळच्या विदर्भाच्या राजधानीच्या नावाने जगाला ज्ञात आहे.

### सालबर्डी

याच जिल्ह्यात सातपुडा पर्वताच्या रम्य कुशीत सालबर्डी वसली आहे. येथे वाल्मिकी ऋषींचा आश्रम होता. सीता इथेच आश्रयाला होती. लव-कुश ह्याच ठिकाणी वाढले अणि राम-सीतेचे पुनर्मिलन येथेच झाले, अशी आख्यायिका आहे. श्री चक्रधरस्वामींनीही येथेच तप केले होते.

येथले रिद्धपूर म्हणजे महानुभावपंथीयांची काशी. या पंथाचे चौथे कृष्ण श्री गोविंद प्रभू यांचे वास्तव्य रिद्धपूरला होते. त्यांच्याकडून चक्रधर स्वामींनी ज्ञान प्राप्त केले आणि महानुभाव पंथ पुरस्कृत केला. (तेरावे शतक) अनेक पुरोगामी तत्त्वांची बांधिलकी स्वीकारलेला हा पंथ येथूनच पुढे भारतभर पसरला.

चक्रधरस्वामींची शिष्या महदंबा महानुभाव वाङ्मयात आद्य कवयित्री म्हणून प्रसिद्ध आहे. तिचा चक्रधरांच्या स्तुतीपर लिहिलेला अभंग लीळाचरित्रात आहे. तद्वतच धवळे हे तिचे एक सुंदर कथागीत असून गेयता हे त्याचे वैशिष्ट्य आहे. आजही महानुभावांच्या मठातून हे धवळे सामूहिकरित्या म्हटले जाते. देश-विदेशातील संशोधक आजही रिद्धपूरला येत असतात.

### राजज्योतिषी कृष्णः

या भूमीत अंदाजे सतराव्या शतकात एक प्रसिद्ध ज्योतिष घराणे होऊन गेले. या घराण्यातला विद्वान ज्योतिषी आणि ग्रंथकार कृष्ण याने काही ग्रंथांची निर्मिती केली. बीजगणितावर टीकाग्रंथ लिहून स्वतःचे काही नवे सिद्धांत मांडले. त्यावेळचा राजा जहांगीर याने त्याला आपल्या दरबारात राजज्योतिषी म्हणून मानाचे स्थान दिले.

### सुर्जी-अंजनगाव

साहित्याचा अभिजात वारसा मिळालेले एक गाव सुर्जी अंजनगाव. संत एकनाथ महाराजांच्या शिष्यपरंपरेतले विदर्भकवी श्री देवनाथ महाराज (इ.स. १७५४-१८३१) हे अंजनगावचेच. श्री. राजेश्वरपंत कमाविसदार यांच्या कुळात सुर्जी येथे 'देवराज' जन्माला आले. त्यांना कुस्त्यांचा भारी शौक. 'निरुद्योगी' म्हणून घरी आईशी व मोठ्या बंधूशी भांडण झाले. त्यामुळे ते सुर्जीच्या हनुमान मंदिरात गेले आणि ध्यान लावले.

योगायोगाने या २७ वर्षांच्या ब्रह्मचारी देवरावांची संत एकनाथांच्या संप्रदायातील तेरावे पुरुष श्री गोविंदनाथ यांच्याशी गाठ पडली. गोविंदनाथांनी त्यांच्यावर अनुग्रह केला. आणि त्यांचे 'देवनाथ' हे सांप्रदायिक नाव ठेवले. तेव्हापासून त्यांचा काव्यप्रवास आणि कीर्तने यांना प्रारंभ झाला. या निमित्ताने ते भारतभर फिरले. संत नामदेव महाराजानंतर पंजाबात जाऊन समाजप्रबोधनाचे कार्य श्री देवनाथांनीच केले. अनेक ठिकाणी आपले मठ स्थापन केले. आज मुख्य मठ सुर्जीला आहे.

श्री देवनाथ महाराज या मुख्य पीठावर विराजमान झाले. त्यांच्यानंतरचे पीठाधीश श्री दयाळनाथ महाराज हेही श्रेष्ठ प्रतीचे आख्यानक कवी होते. त्यानंतरच्याही पीठाधीशांनी काव्यरचना केल्या. श्री देवनाथ व श्री दयाळनाथ यांची कविता प्रासादिक आहे.

द्रौपदीचा कृष्णासाठीचा धावा दयाळनाथ या शब्दांत बद्ध करतात- 'ये धावत कृष्णा बाई अति कनवाळे निज जन मन सर समराळे.' हृदय हेलावून टाकणारी अशी ही रचना आहे. श्री दयाळनाथांचे निधन वयाच्या ४८ व्या वर्षी (इ.स.१८३६) हैद्राबाद येथे झाले. श्री देवनाथांच्या निधनाची कथा मात्र मती गुंग करून टाकणारी आहे.

रामनवमीच्या निमित्ताने ग्वाल्हेरला ते कीर्तन करण्यासाठी गेले. अपार गर्दीत त्यांनी कीर्तन सुरू केले. एवढ्यात मंडपाला आग लागली. शेकडो लोक मारले गेले. देवनाथ महाराज बाहेर पडणार तोच कुणीतरी त्यांना कुत्सितपणे म्हणाले, 'नैन छिन्दती शस्त्राणी, नैन दहती पावक.' हे ऐकून देवनाथांनी त्या इसमाला घट्ट पकडून ठेवले आणि त्याच्यासोबतच ते अग्निदेवतेच्या स्वाधीन झाले. श्री देवनाथांची समाधी ग्वाल्हेरला आहे अन् त्यांनी स्थापित केलेला मठही तेथे आहे.

**सुरेश अकोटकर (भावचित्रे)**
**अमरावती .**

### अमरावती : काही वेधक नोंदी

अमरावती हे नाटककारांचे गाव आहे, तसेच ते नाट्यवेड्यांचे गाव आहे. नामवंत कंपनींची नाटके अमरावतीला आली की ती पाहण्यासाठी दूरदूरून नाटकांचे रसिक येत. छकडा, पायटांगी व सायकल ही त्यावेळची वाहने. काही श्रीमंत व्यक्ती घोडा वा घोडागाडी वापरत. जमेल त्या वाहनाने माणसे येत. रात्रभर नाटकांचा आस्वाद घेत. त्या काळची नाटकंही 'रात्रीचा समय सरूनी येत उषःकाल हा...' अशा स्वरूपाची असत.

अमरावती लेखक-कवींचेही गाव आहे. या शहराने महाराष्ट्राला 'साहित्य-सोनियाच्या खाणी' दिल्या आहेत. मराठी कवितेला मुक्तछंद देणारे कवी अनिल येथेच शिकले. कुसुमावती देशपांडेही येथल्याच. कुसुमावतींचे वडील जयवंत कविता लिहीत. शालेय जीवनापासूनच कुसुमावती येथल्या साहित्य विशेष आणि सांस्कृतिक कार्यक्रमात हिरिरीने भाग घेत. 'कुसुमानिल' यांचे प्रेम येथेच फुलले.

### बेडेकर इथलेच

विश्राम बेडेकर यांचा जन्म अमरावतीचाच. त्यांची नाटक व चित्रपटातील कामगिरी सर्वांना परिचित आहे. 'ब्रह्मकुमारी' हे त्यांचे पहिले नाटक दि. १५/६/१९३३ रोजी रंगभूमीवर आले. (संगीत- मास्टर दीनानाथ) त्यानंतर त्यांनी मोजकेच लेखन केले. त्यांच्या वास्तव्यातली अमरावती, विदर्भ महाविद्यालय, मित्रमंडळी आणि येथे भोगलेले दारिद्र्य... या साऱ्या आठवणी त्यांनी आपल्या आत्मचरित्र ग्रंथातून (एक झाड दोन पक्षी) मांडल्या आहेत. बेडेकरांचे वडील रेल्वे स्टेशन परिसरातील आळशी राममंदिराचे पुजारी होते.

कवी कृष्णमूर्ती, गोपाळराव बेडेकर, बा. सं. गडकरी, ना. कृ. दिवाणजी, दादासाहेब आसरकर, डॉ. श्री. व्यं. केतकर, काकासाहेब सहस्त्रबुद्धे. वि. रा. हंबर्डे, रा. द. सरंजामे, डॉ. भवानराव म्हैसाळकर, मा. ल. व्यवहारे, पु. य. देशपांडे, खापर्डे बंधू, वीर वामनराव जोशी, नानासाहेब बामणगावकर, कृष्णाबाई खरे, अ. तु. वाळके, जा. दा. राऊळकर, वासुदेवशास्त्री खरे, तात्यासाहेब सबनीस, भाऊसाहेब असनारे, अप्रबुद्ध, संत गुलाबराव महाराज, संत तुकडोजी महाराज, गीता साने, सुदामजी सावरकर, विमलाबाई देशपांडे आदींनी आपल्या लेखनकर्तृत्वाने आपला काळ गाजवला आहे. संत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता, श्लोक, अभंग आणि इतर लेखन यांची जनमानसावरील पकड आजही कायम आहे. त्यांचे एकूणच लेखन चिरंजीवी ठरले आहे.

### वाचता वाचता

जुन्या लेखनकर्तृत्वाचा धांडोळा घेताना काही संस्मरणे वाचनात आली. सुप्रसिद्ध कादंबरीकार बाळकृष्ण संतुराम गडकरी, यवतमाळचे यशवंत खुशाल देशपांडे आणि डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर हे तिघेही जिवाभावाचे मित्र होते. ते एकाच शाळेत शिकत. नगर वाचनालयात ग्रंथवाचन करीत आणि मराठी वाङ्मयावर चर्चा घडवत.

सुप्रसिद्ध कादंबरीकार गीता साने अमरावतीतली १९२६ मध्ये प्रथम श्रेणीत मॅट्रिक होणारी पहिली मुलगी. सायन्स कॉलेजचीही पहिली विद्यार्थिनी. लग्नानंतर आडनाव न बदलविणारी. पहिली मराठी लेखिका ! उत्तर प्रदेश व बिहारमध्ये स्त्री-शिक्षणाचा प्रसार करणारी पहिली विदर्भकन्या !

कवी गणपतराव देशमुख हे स्वामी शिवानंद नावाने ओळखले जायचे. अमरावती नगरपालिकेत ते लिपिक होते. इंग्रज अधिकाऱ्यांविरुद्ध कविता रचल्यामुळे १९०७ साली त्यांना सात वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा फर्मावली होती. परंतु पुढे वऱ्हाडात पाय ठेवू नये, या अटीवर त्यांना मुक्त करण्यात आले. कविता लेखनामुळे तुरुंगात जाणारा हा पहिलाच वैदर्भीय कवी असावा.

डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी लेखन केले नसले तरी ते अनेक लेखकांचे प्रेरणास्थान होते. डॉ. वि. भि. कोलते यांनी आपल्या आत्मचरित्रात (अजूनि चालतोचि वाट) भाऊसाहेबांच्या अनंत उपकारांचे स्मरण मोठ्या हृद्यतेने केले आहे. भाऊसाहेबांबद्दल एक विशेष माहिती मिळाली. त्यांना स्वतःचे नाव इंग्रजीत Panjab ऐवजी Punjab लिहिणे योग्य वाटत नसे. कुणी असे लिहिल्याचे लक्षात आले की ते नावातल्या 'यू' अक्षराचा 'ए' करीत.

सुप्रसिद्ध नट-दिग्दर्शक गजानन जागिरदार अमरावतीलाच चौथीपर्यंत शिकले. सुप्रसिद्ध नाटककार जयराम केशव ऊर्फ भाऊसाहेब असनारे यांनी आपले आयुष्य संगीत नाटकांना वाहून टाकले. आजही असनारे घराण्याची आजची पिढी संगीत, वादन आणि गायन या क्षेत्रात नाव मिळवित आहे. परंतु आज हे कुटुंब सांगलीला स्थायिक झाले आहे.

दादासाहेब खापर्डे ह्यांनी हिराबाई बडोदेकरांना 'गानकोकिळा' पदवी अमरावतीलाच प्रदान केली होती. पूर्वी राजकमल चौकात 'महाराष्ट्र प्रकाशन' या नावाची सुप्रसिद्ध प्रकाशन संस्था होती. या प्रकाशनाने आचार्य अत्रे, गो. नी. दांडेकर, जयवंत दळवी इ. नामवंत लेखकांची काही पुस्तके एका काळात प्रकाशित केली होती.

कादंबरीकार ह. ना. आपटे यांनी 'जयध्वज' नावाचे नाटक लिहून त्याचा पहिला प्रयोग १९०५ च्या सुमारास अमरावतीला केला होता. विख्यात लेखक रा. भि. जोशी हे अमरावतीला शिकले आणि काही वर्षे अमरावतीच्या डेप्युटी कमिशनरच्या ऑफिसात नकलनवीस म्हणून काम केले. ह.भ.प. ल. रा. पांगारकर हे काही काळ अमरावतीला शिक्षक होते. डॉ. श्री. व्य. केतकर हे त्यांचे विद्यार्थी. अमरावतीच्या एके काळच्या साहित्य आणि सांस्कृतिक जीवनाचा हा धावता आढावा.

●●●●●●●●●

# विद्रोही मराठी साहित्य संमेलन

छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी आयोजित १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्य व संस्कृतीचे अभ्यासक, इतिहास संशोधक व भाषातज्ञ डॉ. अशोक राणा (यवतमाळ) यांची निवड झाली आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांनी पत्रकार परिषदेत घोषित केली. डॉ. अशोक राणा हे १८ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ग्रामीण साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांच्याकडून सूत्रे हाती घेतील.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ १९९९ पासून महाराष्ट्रभर कार्यरत आहे. महात्मा जोतिराव फुले यांनी ग्रंथकार सभेस पाठविलेले पत्र हा विद्रोहीचा वैचारिक जाहीरनामा आहे. न्या. म. गो. रानडेंनी ग्रंथकार सभेत सहभागी होण्याचे निमंत्रण म. जोतीराव फुले यांना दिले; तेव्हा तुमच्या ग्रंथांमध्ये अखिल मानवाचे हित होईल याचे बीज नाही. असे म्हणत म. फुलेंनी उंटावरून शेळ्या वळणाऱ्या घालमोड्या दादाच्या त्या संमेलनात सहभागी होण्यास ठाम नकार दिला होता.

आमचे ग्रंथकार तयार होतील, तेव्हा ते स्वाभिमानाने आपली संमेलने भरवतील असेही म्हटले होते. ग्रंथकार सभेचे २० व्या शतकातील स्वरूप म्हणजे अ. भा. मराठी साहित्य संमेलन आहे. अ. भा. साहित्य संमेलन आणि महामंडळ यांचा आजवरचा व्यवहार हा विषमतावादी राहिला आहे.

चिपळूणच्या साहित्य संमेलनात परशुरामाची मूर्ती स्टेजवर ठेवण्याचा आग्रह, ठाण्यात संमेलन स्मरणिकेत महात्मा यांच्या खुन्याचा पंडित नथुराम' असा उल्लेख करणे असेल. संयुक्त महाराष्ट्राचे सेनानी शाहीर अण्णाभाऊ साठे, शा. गव्हाणकर, शा. अमर शेख, शा. वामनदादा कर्डक, शा. यशवंत चकोर, क्रांतीसिंह नाना पाटील, भाई उद्धवराव पाटील, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, यांना संमेलनासाठी साधे निमंत्रणही न देणे; उलट अनेक दांभिकांना अध्यक्षपदे बहाल करणे, स्वातंत्र सैनिक व थोर गांधीवादी नयनतारा सहेगल यांना यवतमाळला उद्घाटक म्हणून बोलावून नंतर अपमानित करणे, संविधान जाळण्याचे समर्थन करणारांना प्रतिष्ठा देणे अशी अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या विषमतावादाची असंख्य उदाहरणे आहेत. किंबहुना विषमतावादी सांस्कृतिक राजकारणाचे ते मूखंडच आहे.

म्हणूनच ब्राह्मणी, भांडवली, पुरुषत्ताक मूल्य आणि विषमतावादी सांस्कृतिक विचारांचा विषारी प्रचार-प्रसार करणाऱ्या संस्था, संघटना व संमेलनाच्या विरोधात भूमिका घेण्याचा फुले-आंबेडकरांचा संदेश मानून आपण विचार व संघटित कृती केली पाहिजे.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ जीवनाच्या सर्व क्षेत्रात समतावादी संस्कृती व साहित्य विचारांचा पुरस्कार करते. विद्रोही साहित्य चळवळीच्या वतीने आजवर मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, सोलापूर, नंदुरबार, वाशी (नवी मुंबई),



पुणे, मनमाड, धुळे, परभणी, बुलढाणा, हिंगोली, नाशिक, उदगीर, वर्धा, अमळनेर इत्यादी ठिकाणी साहित्य संमेलने, एक आंतरराज्य (निपाणी), एक विद्रोही महिला साहित्य संमेलन (पुणे) यशस्वीपणे आयोजित करण्यात आली आहे.

कालकथित बाबुराव बागुल, कवी वाहरू सोनवणे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. अजिज नदाफ, आत्माराम कनिराम राठोड, कॉ. तारा रेड्डी, तुळसी परब, डॉ. आ. ह. साळुंखे, संजय पवार, जयंत पवार, उर्मिला पवार, डॉ. श्रीराम गुंदेकर, डॉ. प्रतिभा अहिरे. विमल मोरे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे, डॉ. वासुदेव मुलाटे यांसारख्या सर्जनशील साहित्यिकांनी विद्रोही साहित्य संमेलनाची अध्यक्षपदे भूषविली आहेत.

### डॉ. अशोक राणा यांचे लेखन कार्य

डॉ. अशोक राणा हे मराठी साहित्य, भाषा, इतिहास, लोकसंस्कृती, प्रबोधन, संत वाङमय, आधुनिक समीक्षा, चित्रकला, नाट्य अशा विविध विषयांमध्ये पारंगत संशोधक म्हणून ख्यातनाम आहेत. त्यांची संशोधन व प्रबोधनपर ७६ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी विलास सारंग यांच्या कथांवरील अतिवास्तववादी छाया तसेच मराठी कथा व कवितांमधील नाग मिथक व प्रतिमा अशा आधुनिक व प्राचीन विषयांवरील अभ्यासापासून तरूण वयात संशोधनाला सुरूवात केली.

त्यांनी भाषा व साहित्य या विषयात साहित्याची भाषा, साहित्य निर्मिती प्रक्रिया, मराठीच्या मानगुटीवर संस्कृतची वेलांटी, बहुजन साहित्य म्हणजे काय? साहित्याची जात्यांधांची झुंडशाही, इत्यादी ५, प्राचीन इतिहास- मिथके- पुरातत्व- सण-उत्सव अशा लोकसंस्कृती संदर्भातील सिंधू जणांनी निऋती, शोध सरस्वतीचा, गणेश जन्माच्या कथेचा अर्थ, देवादिकांचे रहस्य, नागकथा व भूतपिशाच्च, कृषि विरूद्ध ऋषी, बौद्ध गणपती व सरस्वती, आदिमाया, सणांची सत्यकथा, मिथक साहित्य व संस्कृता इत्यादी २३ पुस्तके लिहिली.

प्रबोधनपर गाडगे बाबा, बाबासाहेब व भाऊसाहेब, डॉ. आंबेडकर व मातृदेवता, बुद्ध व बुद्धिप्रामाण्यवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन व जादूटोणा, समरसतेचे वारकरी, मनुस्मृती-संघ व संविधान, राष्ट्रसंत तुकडोजी विचार इत्यादी १३, संत वाङ्मयासंदर्भातील वेदोक्त प्रकरण व संत साहित्य, रामदासी परंपरा व संत तुकाराम, सार्वकालिक संत तुकाराम, विठोबा कोणाचा? इत्यादी ५, जिजाऊ, शिवकाल, छत्रपती संभाजी, आहिल्यामाई या मध्य युगाच्या अंतिम चरणातील इतिहासाबद्दल : आरोपीच्या पिंजऱ्यात संभाजी, शिवशाहीचा उदय, शिवरायांचा प्रताप, शिवचरित्राची शिकवण, शिवाजी शूद्र कसे? , शिवराज्याभिषेक १ ला व २ रा अशी ११ पुस्तके, धर्म-ब्राह्मणी धर्म, शिवधर्म या संदर्भात शिवधर्म चिंतन, शिवधर्माची प्राथमिक संहिता, ब्राह्मणी धर्म व शिवधर्म इत्यादी ५, आणि संशोधन पद्धती इत्यादी संदर्भात इतिहास संशोधन क्लासिकल व मासिकल, इतिहासाचे विकृतीकरण, असत्याची सत्य कथा, डॉ. आ. ह. साळुंखे-साहित्य व विचार इत्यादी ३, अशी एकूण ७६ पुस्तके डॉ. अशोक राणा यांनी लिहिलेली आहेत.

पाश्चात्य व आफ्रीकी मातृदेवता, भगवत गीतेतील चार्वाक, सरस्वतीची सत्यकथा, कॉ. शरद पाटील यांची मिथक चिकित्सा, बसवेश्वरांचा देव इत्यादी विषयांसंदर्भातील २६ पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

साप्ताहिक चित्रलेखा (संपादक-ज्ञानेश महाराव) मधील असत्याची सत्य कथा आणि मातृपूजन विश्वभजन या डॉ. अशोक राणा यांच्या लेखमाला विशेष गाजल्या. रूजलेल्या व लादलेल्या मिथकांनी विकृत वळण घेऊन इतिहासाचा ताबा घेऊ नये याची संयतपणे काळजी घेत मिथकांमागील अर्थ-अन्वयार्थ स्पष्ट करण्याचा निरंतर प्रयत्न डॉ. अशोक राणा करत आहे.

### माणसांशी जोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारा साहित्यिक

सत्याची कास धरत ते भूतभाषा पैशाची संदर्भात लिहितात, नागभाषेचा मागोवा घेत ते कॉ. शरद पाटलांच्या संशोधक पाऊलवाटेने स्त्रीराज्याची आद्य राणी गणमाता निऋती पर्यंत पोहोचतात. छत्रपती संभाजी महाराजांवरील ब्राह्मणी छावणीने घेतलेल्या आक्षेपांचा सामना ते करतात.

गाडगे बाबा व तुकडोजी महाराज यांच्या प्रबोधनाचा पुनरूच्चार करतात. बुद्ध, तुकाराम, महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांचा सांगावा सांगतात. इतिहासाला व संशोधनाला सत्याच्या पायावर उभे राहत या मातीशी व माणसांशी जोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारा साहित्यिक व अभ्यासक म्हणून मराठी बहुजन जनता डॉ. अशोक राणा यांना ओळखते.

वारकरी सार्वकालिक तुकारामांचा परिचय करून देणाऱ्या डॉ. अशोक राणा यांनी शिवधर्म मांडणी व उभारणीत मोलाचा वाटा उचलला आहे. आजच्या विद्वेषाच्या कालखंडात संविधानिक लोकशाहीवर हल्ला होत असताना माणूसकीचा इतिहास, वारसा व त्याची पुर्नमांडणी करणाऱ्या डॉ. अशोक राणा यांची १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड ही सार्थक असल्याचे जाणवते.

●●●●●●●●●

# मावशी, मामा कथित मुनीसह चौघांना 24 पर्यंत पीसीआर



## अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणाचा जिल्हाभरातून निषेध

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी( दि.20 )** - शिरखेड पोलीस स्टेशनअंतर्गत एका पंथाची काशी समजल्या जाणाऱ्या तीर्थस्थळी एका कथित मुनीने व त्याच्या सहकाऱ्याने अल्पवयीन शिष्येवर अत्याचार करुन तिला गर्भवती केले. यात पिडीतेच्या मावशी व मामाने आरोपींची पाठराखण केली. याप्रकरणी शिरखेड पोलिसांनी गुन्हे दाखल केले. पोलिसांनी मुलीची मावशी, मामा, मुनीसह चौघांना अटक केल्यानंतर या आरोपींना आज (दि.20) न्यायालयात हजर करण्यात आले होते, कोर्टाने या आरोपींना 24 फेब्रुवारीपर्यंतची पोलीस कोठडी सुनावली आहे. पवित्रस्थळी घडलेल्या या घटनेचा जिल्हाभरातून निषेध व्यक्त केला जात आहे. सुरेंद्र मुनी तळेगावकर बाबा( वय 75, रा.रिध्दपूर), बाळासाहेब देसाई ( वय 40 रा.नांदेड, ह.मु.रिध्दपूर) या दोघांनी मठात त्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला. ही अल्पवयीन मुलगी आता 8 महिन्याची गरोदर झाली आहे. 19 फेब्रुवारी 2025 रोजी शिरखेड पोलीस स्टेशन येथे पीडित मुलीचे वडील व पीडित मुलीने तक्रार दिली.

### मठाच्या तळघरात अत्याचार

यातील पिडीताचे मामा निखिल सुरेंद्र तळेगावकर( बदललेले नाव) व मावशीने या कथित मुनिकडे दिक्षा घेतली होती. या पंथामध्ये दिक्षा घेतलेल्या व्यक्तीचे नाव, वडीलांचे नाव व आडनाव बदलून ज्या मुनिकडून दिक्षा घेतली जाते, त्या मुनीचे नाव व आडनाव दिक्षेकऱ्याच्या नावासमोर लागते. पिडीता ही नागपूर येथील असून ती सुध्दा दिक्षा घेणार होती. या पिडीतेने आपल्या तक्रारित सांगितल्याप्रमाणे, 02 एप्रिल 2024 चे रात्रीचे 12 वाजता ते दि 03 नोव्हेंबर 2024 चे रात्रीचे 12 वाजे पर्यंत या घटनेच्या कालावधीची नोंद करण्यात आली आहे. घटनेवेळी मठातील तळघरात पीडित मुलीच्या मावशीच्या सहकार्याने सुरेंद्र मुनी तळेगावकर व बाळासाहेब देसाई या नराधमांनी मुलीवर जबरीने शारीरिक अत्याचार केला. त्यामूळे ही पीडित मुलगी 8 महिन्याची गरोदर राहीली.

### आरोपींचा डीएनए तपासणार

शिरखेड पोलीसांनी कथित आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता 1860, 376, 376ष, 376(2)(ढ), 323,506, आणि पोस्कोच्या कलम 4,6 नुसार बलात्कार व पोस्को कायद्याअंतर्गत शिरखेड पोलिसांनी संशयीत आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला. शिरखेड पोलिसांनी मोर्शी उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सचिन लुले, पीएसआय रणखाबे, अंमलदार नितेश वाघ,संजय वाघमारे, संदीप वंजारी यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. याप्रकरणी न्यायालयाच्या परवानगीनुसार सुरेंद्र मुनी तळेगावकर बाबा व बाळासाहेब देसाईची डीएनए तपासणी केली जाणार आहे.

# संत्रा दर स्थिर, टनाला 40 हजारी दर

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.20 )** - आंबिया बहरातील फळांची आवक वाढती असल्याने संत्रा फळांचे दर दबावात होते. आता मृग बहारातील फळांची आवक मर्यादित आणि मागणी अधिक असल्याने संत्रा फळाच्या दरातील तेजी टिकून असल्याचे व्यापारी सूत्रांकडून सांगण्यात आले. सध्या चांगल्या प्रतिच्या संत्रा फळांना प्रति टन 40 हजार रुपयांचा दर मिळत असून, हा दर स्थिर असल्याची माहिती आहे.

जिल्ह्यातील संत्रा व्यापारी राजु तायडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, द्राक्ष बागांना पावसाचा फटका बसला. परिणामी, द्राक्षाची बाजारातील आवक कमी आहे. त्यासोबतच पंजाब भागात उत्पादित होणाऱ्या किन्नोचा हंगाम देखील अंतिम टप्प्यात आहे.

त्यामुळे ही दरी (गॅप) मृग बहरातील संत्रा फळांच्या माध्यमातून भरून निघत असल्याने बाजारातील तेजी टिकून आहे. मृग बहरातील संत्रा फळांची बाजारात 20 जानेवारीपासून आवक सुरू झाली. सुरुवातीच्या फळांना 40 हजार रुपये टन असा दर मिळाला. त्यानंतर आतापर्यंत याच दराने संत्रा फळांचे व्यवहार होत असल्याचे सांगतात. मार्च अखेरपर्यंत मृग बहरातील संत्रा विक्रीसाठी उपलब्ध राहतो. व्यापाऱ्यांद्वारे बाजाराचा कल लक्षात घेता काही प्रमाणात संत्रा फळांची साठवणूक केली जाते. व्यापाऱ्यांकडील हा संत्रा एप्रिलपर्यंत उपलब्ध होतो. त्या वेळी काही अंशी तेजीचा फायदा होत, असल्याची माहिती त्यांनी दिली.राज्यात सुमारे दीड लाख हेक्टरवर संत्रा लागवड आहे. त्यातील एक लाख हेक्टर क्षेत्र अमरावती जिल्ह्यात आहे. यापासून आंबिया आणि मृग बहर अशा दोन्ही हंगामांत 10 लाख टन उत्पादन मिळते. याचे वर्गीकरण केल्यास मृग बहरातील संत्रा फळांची उत्पादन तीन, तर आंबिया उत्पादन सात लाख टनांच्या घरात राहते, अशी माहिती संत्रा बागायतदारानी दिली.



“ सध्या बाजारात चांगल्या प्रतीच्या संत्रा फळांना चांगला दर मिळत आहे. याचे 40 हजार रुपये टन याप्रमाणे दर स्थिर आहेत. त्यानंतरच्या प्रतिसाठी सरासरी 35 हजार रुपये टन इतका दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान आहे. बाजारात इतर फळांची उपलब्धता नसल्याने हे दर यापुढील काळात टिकून राहतील, अशी अपेक्षा आहे.

**शरद कोसरे, संत्रा उत्पादक, पथ्रोट.**

## यावली शहिद येथील तुकडोजी महाराज यांच्या मंदिरात चोरी

**अमरावती** - यावली शहिद येथील संत तुकडोजी महाराज यांच्या मंदिरातील पानपेटी लोखंडी रॉडने तोडून चोराने सात हजाराची रोख लंपास केली. या घटनेची तक्रार मनोज सदाशिवराव चौधरी (45, रा. शिक्षक कॉलनी, यावली शहिद) यांनी 19 फेब्रुवारी रोजी माहुली जहागिर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी तीन अनोळखी इसमाविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. मनोज चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, 19 फेब्रुवारी रोजी पहाटेच्या वेळेत तीन इसमांनी संत तुकडोजी महाराज यांचे जन्म स्थान यावली शहिद मंदिरातील चॅनल गेट तोडले आणि मंदिरात प्रवेश केला. त्यानंतर अज्ञात चोराने दोन दानपेटी लोखंडी रॉडने फोडली आणि त्यातील 7 हजाराची रोख लंपास केली. या तक्रारीनंतर माहुली जहागिर पोलिसांनी श्वान पथक व फॉरेन्सीक लॅब चमुला बोलाविले.



## मेळघाटात जंगलातील पाणवठ्यावर दिसले वाघ कुटूंब

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )**- मेळघाट व्याघ्र प्रकल्पातर्फे 13 ते16 फेब्रुवारीदरम्यान तिसरे पक्षी सर्वेक्षण पार पडले. एरवी मेळघाटाच्या राखीव जंगलात जाण्यास बंदी असली तरी पक्षी सर्वेक्षणा दरम्यान वनकर्मचाऱ्यां सोबत तिथे दाखल झालेल्या पक्षिनिरीक्षकांना वाघाचे अख्खे कुटुंब दिसले.

पक्षिनिरीक्षक किरण मोरे, मनीष ढाकूलकर, प्रशांत तिरमारे यांना तीन बछड्यांसह वाघाच्या अख्ख्या कुटूंबाचे दर्शन झाले.

16 फेब्रुवारीच्या दुपारी पक्षिनिरीक्षक किरण मोरे वन संरक्षक सोबत पक्षिनिरीक्षणासाठी निघाले. यादरम्यान एका बशीच्या आकाराच्या पाणवठ्याजवळ एक जुने मचाण होते. थकल्यामुळे पुढचे पक्षिनिरीक्षण मचाणावर बसून करण्याचे मोरे यांनी ठरविले. त्यामुळे सहकारी पुढे निघून गेले.

काही वेळाने माकडांचा अलर्ट कॉल आला. पाठोपाठ भेडकी ओरडली. यानंतर एक वाघीण सावकाशपणे पाणवठ्यावर आली व पाणी पिऊ लागली. काही क्षणांतच मचाणाखालून तीन बछडे एकत्रित पाणवठ्याकडे जात असल्याचे त्यांना दिसले. जवळपास दहा मिनिटांनी एक मोठ्या आकाराचा वाघ पायवाटेवरून मचाणाजवळ आला आणि पाणवठ्याकडे न जाता परत फिरला. पक्षिनिरीक्षणाकरिता गेलेले त्यांचे मित्र व वनरक्षक यांनीही हे पाच वाघांचे कुटुंब पाहीले.

# वीज रोहित्रातील ऑईल, केबल चोरी करणारे अटकेत

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )** - वीज रोहित्रातून ऑईल व वीज केबल चोरी केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली. अब्दुल इद्रीस अब्दुल शहिद व भंगार विक्रेता मोहम्मद सलीम मोहम्मद हमीद (रा. ताजनगर, अमरावती) अशी आरोपींची नावे आहे. त्याच्या ताब्यातून 50 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.


अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात रोहीत्रे डीपीमधील ऑईल तसेच केबल तार चोरीच्या घटना वाढल्या होत्या. दरम्यान लोणी पोलिस ठाण्यात 6 जानेवारी रोजी लोणी वीज वितरणाचे सहायक अभियंता सुदाम गजानन पाकधाने यांनी तक्रार दिली की, टाकळी अंतर्गत असलेले दहिगाव धरण येथील सोळंके यांचे शेतातील कृषी पंप रोहित्र, स्टोन क्रशर गावठान रोहित्र, फुलआमला येथील कांडलकर यांचे कृषी पंप रोहित्रे व ऑइल अज्ञात चोरट्याने चोरी केले. या तक्रारीवरून लोणी पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करून तपास सुरु केला. सदर गुन्ह्यांना आळा बसविण्यासाठी पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आदेशित केले. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा समांतर तपास करीत असतांना, पोलिसांनी तांत्रिक पुरावे व गुप्त माहिती काढली. त्यावेळी माहिती मिळाली की, मुर्तीजापूर येथील अब्दुल इद्रीस हा होन्डा कंपनीची शाईन मोटर सायकल क्रमांक एमएच 30 बीआर 6757 ने अमरावती येथे रोहीत्र डिपी ऑईल तसेच तार विक्री करण्यासाठी आला आहे. या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा रचून आरोपी अब्दुल इद्रीसला ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्याची चौकशी केल्यानंतर, त्याने नांदगांव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, तिवसा अशा आदी परीसरात दुचाकीने येऊन पाहणी केली आणि त्यानंतर रोहीत्र्यांमधील आईल व केबल चोरी केल्याची कबुली दिली. हा चोरीचा माल अमरावती येथील भंगार विक्रेता मोहम्मद सलीम मोहम्मद हमीद (रा. ताजनगर, अमरावती) याला विकल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी मोहम्मद सलीमच्या घराची घरझडती घेतली असता, त्याच्या घरात अंदाजे 25 लिटर ऑईल व तार असा एकुण 34 हजाराचा माल आढळून आला. पोलिसांनी तो माल जप्त केला. तसेच आरोपी अब्दुल इद्रीसच्या ताब्यातून दुचाकी जप्त गेली. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक नितीन इंगोले, पोलिस हवालदार सुनील महात्मे, सैय्यद अजमत, सुधीर बावने, निलेश डांगोरे, चेतन दुबे, हर्षद घुसे, सुरेश पवार यांनी केली.

## खडका येथून पाण्याची मोटार लंपास

**अमरावती** – बेनोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खडका स्थित शेतातून चोराने पाण्याची मोटार व केबल असा एकुण 17 हजार 500 रुपये किमंतीचा मुद्देमाल लंपास केला. सुनिल तुकाराम यावलकर (55, रा. महात्मा फुले नगर, यावलकर वाडी, वरुड) यांनी या घटनेची तक्रार 19 फेब्रुवारी रोजी बेनोडा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# शिवजयंती उत्सवासाठी उभारली भव्य गडकिल्ल्याची प्रतिकृती



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि. 20 )** - शिव - शाहू - फुले - आंबेडकर विचार मंचच्या वतीने आयोजित शिव व्याख्यान कार्यक्रम उद्या 22 फेब्रुवारी ला होणार असून यावेळी शिव पोवाड्याचा बहारदार कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात आला आहे. त्यासाठी स्थानिक जि.प. हायस्कुल च्या रंगमंचाला भव्य शिव किल्ल्याचे स्वरूप देण्यात येत आहे. शहरात पहिल्यांदाच होणाऱ्या या भव्य दिव्य किल्ल्याचे आकर्षण शहरवासीयांना लागले आहे.

प्रसिद्ध इतिहासकार व छत्रपती शिवाजी महाराज यांचे गाढे अभ्यासक व वक्ते मराठा सेवा संघाचे डॉ. श्रीमंत कोकाटे यांचे व्याख्यान यावेळी होणार असून त्या अगोदर शिवशाहीर भगवान गावंडे यांचा पोवाड्याचा कार्यक्रम याच रंगमंचावर होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. जि.प. हायस्कूलमध्ये सायंकाळी सायंकाळी 6 वाजता कार्यक्रमाची सुरूवात होणार असून याच वेळी शिवजयंती निमित्त आयोजित रिल्स स्पर्धेचे बक्षीस समारंभ सुध्दा पार पडणार आहे. तरी शिव - शाहू - फुले - आंबेडकर विचार मंच द्वारा आयोजित या भव्य दिव्य कार्यक्रमाला आपण मुलाबाळांसह हजेरी लावून महाराजांचा इतिहास ऐकावा असे आवाहन माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप व आयोजन समितीने केले आहे.

# आजपासून इयत्ता 10 वी ची परिक्षा

## अमरावती विभागात 163714 विद्यार्थी देणार परिक्षा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )**- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या माध्यमांतून राज्यभरात उद्या 21 फेब्रुवारी 2025 पासून दहावीची परीक्षा सुरू होत आहे. तर परीक्षेला 16 लाख 11 हजार 610 विद्यार्थी बसले आहेत. तर यामध्ये 8 लाख 64 हजार 120 मुले, 7 लाख 47 हजार 471 मुली, तर 19 ट्रान्सजेंडर परीक्षा देणार आहेत. तर 23 हजार 492 माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांची नोंदणी केली आहे. तर 5 हजार 130 मुख्य केंद्रांवर परीक्षा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ हे पाच जिल्हे मिळून एकुण 1 लाख 63 हजार 714 विद्यार्थी इयत्ता दहावीची परिक्षा देतील.

### तालुक्यात 2 हजार 552 विद्यार्थी देणार परिक्षा

दहावीच्या विद्यार्थ्यांची, बोर्ड परीक्षा शुक्रवारपासून (ता.21) सुरू होत आहे. यावर्षी चांदूरबाजार तालुक्यात,2 हजार 552 विद्यार्थी 10 वी परीक्षा देणार आहेत. या सर्व परीक्षार्थींची परीक्षेची बैठक व्यवस्था, तालुक्यातील 13 परीक्षा केंद्रांवर करण्यात आली आहे. सोईच्या दृष्टीने या 13 परीक्षा केंद्रांची विभागणी चांदूरबाजार, आसेगाव व अचलपूर, या तीन परीक्षा कस्टडीत करण्यात आली आहे. 10 वीच्या 2 हजार 552 विद्यार्थ्यांपैकी, 1 हजार 378 विद्यार्थी चांदूरबाजार परीक्षा कस्टडी अंतर्गत परीक्षा देणार आहेत. या कस्टडी अंतर्गत एकूण सात परीक्षा केंद्रांवर, या परीक्षार्थींची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. या पैकी तीन परीक्षा केंद्र चांदूरबाजार शहरात,तर उर्वरित चार ग्रामिण भागांत आहेत. या डी.सी.24 कस्टडीत येणाऱ्या केंद्रांची नावे व विद्यार्थी संख्या अशी आहेत. नगर परिषद विद्यालय चांदूरबाजार (176), जिजामाता माध्यमिक विद्यालय चांदूरबाजार (223), राणी लक्ष्मीबाई कन्या शाळा चांदूरबाजार (225), नागनाथ विद्यालय ब्राम्हणवाडा थडी (194), शिवाजी हायस्कूल शिरजगांव बंड( 163), शिवराव विद्यालय घाटलाडकी(233),गुणवंत बाबा विद्यालय तळेगाव मोहना (164), अशा प्रकारे परीक्षा केंद्र निहाय बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.

### गैरप्रकार घडलेल्या 701 केंद्रांवर संपूर्ण स्टाफ नवीन

कोरोना काळातील 2021 व 2022 या दोन परीक्षा वगळून मागील पाच वर्षात म्हणजे 2018, 2019, 2020, 2023 आणि 2024 या परीक्षांमध्ये गैरप्रकार आढळून आलेल्या 701 केंद्रामधील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना बदलून त्या केंद्रांवर संपूर्ण नीव स्टाफची नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे विभागात 139 केंद्रावर नवीन स्टाफ असेल. याशिवाय नागपूर विभागात 86, छत्रपती संभाजीनगर 155, मुंबई 18, कोल्हापूर 53, अमरावती 98, नाशिक 93, लातूर 59 अशा केंद्रावर नवीन स्टाफची नेमणुक असेल. कोकण विभागात गेल्या पाच वर्षात एकाही केंद्रावर गैरप्रकार घडलेला नाही, त्यामुळे त्या विभागातील एकाही केंद्रावरील स्टाफ बदलण्यात येणार नसल्याचे मंडळाकडून सांगण्यात आले आहे.

### 15 मे पर्यंत निकाल

शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येत असलेल्या दहावी व बारावीच्या परीक्षेचा निकाल मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात म्हणजे 15 मे पर्यंत लावण्यात येणार आहे, अशीही माहिती शरद गोसावी यांनी दिली.

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

**ओंकारा सेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**

कॉर्पोरेट ऑफिस: कोहिनूर स्क्वेअर, ४७ वा मजला, एन.सी. केळकर मार्ग, आर.जी. गडकरी चौक, दादर पश्चिम, मुंबई - ४०००२८. संपर्क क्रमांक - ९७७३४०६१७५.

**स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**
**नियम ८ (६) नियम ९(१) सह वाचण्याची तरतूद पहा**

सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ९(१) सह वाचलेल्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह वाचलेल्या आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार एम/एस यांना सूचना देण्यात येत आहे. खोडके ऍग्रो एनर्जी, आणि सह-कर्जदार/जामीनदार/भागीदार श्री. प्रशांत विनायकराव खोडके, श्रीमती. सुचिता प्रवीण खोडके आणि श्रीमती मीना रणजीत जगताप आणि श्री. मिलिंद चंद्रकांत खोडके (पाटील) आणि श्रीमती. सीमा प्रशांत खोडके आणि मे. विदर्भ शुगर मिल लि आणि मे. खोडके ग्रो प्रॉडक्ट्स प्रा. लि आणि मे. खोडके ग्रो प्रॉडक्ट्स प्रा.लि खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता तारण/सुरक्षित कर्जदाराकडे आकारली आहे, आणि ज्याचा प्रत्यक्ष ताबा नागपूर नागरी सहकारी बँक लिमिटेड (एनएनएसबी) ने घेतला आहे पीएस ४७/२०२१-२२ ट्रस्टच्या विश्वस्ताच्या क्षमतेनुसार कार्य करणाऱ्या ओएआरपीएलच्या च्या बाजूने अंतर्निहित सिक्युरिटीज आणि त्यांचे सर्व अधिकार आणि अधिकार यासह उक्त कर्जदार आणि गहाण जामीनदार यांच्यावर पडलेली आर्थिक मालमत्ता/संपूर्ण थकबाकी कर्ज पूर्णपणे नियुक्त आणि हस्तांतरित केले आहे. खाली नमूद केलेली मालमत्ता १३.०३.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जशी आहे तशी, जशी आहे तशी, आणि जे काही आहे वर विकली जाईल (बिड सबमिट करण्याची अंतिम तारीख आणि वेळ १२.०३.२०२५ संध्याकाळी ६.०० पर्यंत आहे), रु. ७,१९,८८,७५१.००/- (रुपये सात कोटी एकोणीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार सातशे एकावन्न फक्त) च्या वसुलीसाठी १ मार्च २०१५ रोजी, तसेच आनुषंगिक खर्च, खर्च, शुल्क इत्यादींसह कराराच्या दरावर जमा झालेले व्याज/अवास्तव व्याज आकारले जाईल

ओंकारा सेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (ओंकारा पीएस ४७/२०२१-२२ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे) ने २१.०३.२०२२ च्या असाइनमेंट कराराद्वारे संबंधित कर्जदार/जामीनदारांविरुद्ध असलेली संपूर्ण थकबाकी कर्जेसामुदायिक नागपूर नागरी सहकारी बँक ली. (एनएनएसबी) बँके कडून सुरक्षा अंतर्गत प्राप्त केली आहेत. त्यामुळे, ओंकारा सेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड ने नागपूर नागरी सहकारी बँक लिमिटेड (एनएनएसबी) च्या शूजमध्ये पाऊल टाकले आहे आणि संपूर्ण थकबाकी वसूल करण्यासाठी आणि सिक्युरिटीजची अंमलबजावणी करण्यासाठी ती पात्र झाली आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन, राखीव किंमत, बयाणा ठेव आणि ज्ञात भार (असल्यास) खालीलप्रमाणे आहेत:

| मालमत्तेचे वर्णन | |
|---|---|
| ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२ आणि १३ या दुकानाचे सर्व तुकडा आणि पार्सल एकूण बांधलेले क्षेत्रफळ १५९९.२३ चौ. फूट (१४८.५७ चौ. मीटर.) आणि बाल्कनी ४७६.१७ चौ. फूट. असे एकूण बिल्ट अप एरिया २०७५.४० चौ. फूट. असे एकूण तयार केलेले क्षेत्रफळ २०७५.४० चौ. फुट. (१९२.८८ चौ. मीटर) नाझुल प्लॉट क्रमांक ८ वर बांधण्यात आलेल्या व्यावसायिक संकुलातील दुसऱ्या मजल्यावर, पत्रक क्र. ४८-ब, मौजे- गावठाण अमरावती, प्रगणे-बडनेरा ता. आणि जि. अमरावती, उपनिबंधक अमरावती यांच्या कार्यकक्षेत आणि अमरावती शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील, नगरपालिकेची मालमत्ता क्रमांक ७७१, प्रभाग क्रमांक ३२ मध्ये, श्रीमती यांच्या नावे. सुचिता प्रवीण खोडके आणि आंबट सीमा प्रशांत खोडके आणि सांगितलेली दुकाने सामान्यतः खालीलप्रमाणे आहेत: - पूर्वेकडे: पॅसेजच्या दिशेने पश्चिम: पॅसेज आणि पायऱ्यांच्या दिशेने उत्तर: पॅसेजच्या दिशेने उत्तर: मार्गाने | |
| राखीव किंमत: रु. ९०,००,०००/- | ईएमडी: रु. ९,००,०००/- |
| ई-लिलावाची तारीख १३.०३.२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी २.०० पर्यंत | |
| किमान बोली वाढीची रक्कम रु. ४०,०००/- (केवळ चाळीस हजार) | |
| सहभागाचे बोली पत्र/केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: १२.०३.२०२५ संध्याकाळी ६:०० वा. | |
| तपासणीची तारीख ०३.०३.२०२५ दुपारी ०१.०० ते ०४.०० दरम्यान | |
| ज्ञात दायित्वे ज्ञात नाहीत | |

हे प्रकाशन सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या ९(१) सह वाचलेल्या नियम ८ (६) अंतर्गत कर्जदार/सह-कर्जदारांना पंधरा दिवसांची नोटीस देखील आहे.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया सुरक्षित कर्जदाराच्या वेबसाइटवर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या म्हणजे,http://omkaraarc.com/auction.php.आणि अधिकृत अधिकारी प्रतीक्षा पटेल यांचे संपर्क तपशील (संपर्क क्रमांक ९७७३४०६१७५ आणि राजेंद्र देवर्डे-९३२४५४६६५१ आणि ईमेल-pratiksha.patel@omkararc.com बोलीदार http://www.bankeauction.com या वेबसाइटला देखील भेट देऊ शकतात किंवा सेवा प्रदात्याशी संपर्क साधा एम/एस सी १ इंडिया प्रा. लिमिटेड, दूरध्वनी हेल्पलाइन: +९१-७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाइन ई-मेल आयडी: support@bankeauctions.com, श्री भाविक पंड्या, मोबाईल: ८८६६६ ८२९३७ ईमेल-Maharashtra@c1india.com. दिवाळखोरी आणि दिवाळखोरी संहिता २०१६ च्या कलम २९अ अंतर्गत इच्छुक बोलीदारांनी त्याचे पालन केले पाहिजे आणि घोषणा द्यावी

स्वा/-
अधिकृत अधिकारी,
ओंकारा सेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
(ओंकारा पीएस ४७/२०२१-२२ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून त्याच्या क्षमतेनुसार काम करत आहे)

तारीख: २१.०२.२०२५
ठिकाण: अमरावती

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# 5 चोरीच्या मोटारसायकल जप्त

## गाडगेनगर पोलिसांची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 ) –** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने मोठी कारवाई करत 2 लाख रुपयांच्या 5 चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या असून, विशाल चरणदास जाधव (21 वर्षे, रा. बोडना, तपोनेश्वर, अमरावती) याला अटक करण्यात आली आहे. गुप्त माहितीच्या आधारे कारवाई गाडगेनगर पोलिसांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की तपोवन गेटजवळ एक इसम चोरीची मोटारसायकल विक्री करण्यासाठी फिरत आहे. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तपोवन भागात गस्त सुरू केली आणि तपोवन पुलाखाली संशयास्पद फिरणाऱ्या इसमाला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याचे नाव विचारले असता त्याने विशाल जाधव असे सांगितले. त्याच्याकडे असलेल्या ड्रीम युगा मोटारसायकल (एमएच 27/ इएक्स 0211) बाबत विचारणा केली असता तो समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. त्यानंतर पोलीसी खाक्या दाखविल्यानंतर त्याने चोरीची कबुली दिली. त्याने तपोवन भागातून मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. यानंतर पोलिसांनी अधिक तपास केला असता 4 अन्य मोटारसायकली चोरी केल्याचे उघड झाले. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन ही कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपआयुक्त सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त अरुण पाटील, गाडगेनगर पोलीस निरीक्षक ब्रह्मगिरी आणि गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. डीबी पथकाची उल्लेखनीय भूमिका ही संपूर्ण कारवाई डीबी पथक प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक मनोज मानकर, तसेच मनीष सावरकर, संजय भेलावे, निलेश जुनघरे, गजानन बरडे, सुशांत प्रधान, सागर धरमकर, मतीन शेख आणि सिद्धार्थ श्रृंगारे यांनी केली.

### या दुचाकी केल्या जप्त

ड्रीम युगा (एमएच 27/ इएक्स 0211),पल्सर (एमएच 27/ डीक्यू 7106), स्लेंडर (एमएच 27/ बीसी 8155),पॅशन प्रो (एमएच 27/बिएम 4484), होंडा सिडी डिलक्स (एमएच 27/ एयु 6914)

# पळसखेड येथे ते 19 ते 24 फेब्रुवारी दरम्यान भव्य शिवजयंती महोत्सव



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे ( दि. 20 ) –** तालुक्यातील पळसखेड येथील जय शिवाजी क्रीडा मंडळातर्फे 19 फेब्रुवारी ते 24 फेब्रुवारी दरम्यान भव्य शिवजयंती महोत्सव 2025 चे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये पळसखेड गावातील पाणी टाकीच्या परिसरात 19 फेब्रुवारीला सायंकाळी 7 वाजता शिवपूजन होणार आहे. यानंतर 22 फेब्रुवारीला सायंकाळी 6.30 वाजता उद्घाटन व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री बच्चू कडू राहणार असून उद्घाटक म्हणून आमदार प्रताप अडसड राहणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून अमरावती जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे, सभापती प्रशांत भेंडे, माजी सभापती सरिता देशमुख, बबनराव गावंडे, अरुण देशमुख, प्रकाश मारोटकर, लता महल्ले, जया चवाळे, आरती पारधी आदींची उपस्थिती राहणार आहे. तर 23 फेब्रुवारीला सायंकाळी 6.30 वाजता पळसखेड येथील महिला भजनी मंडळ व विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार ह.भ.प. मधुकर देशपांडे व अशोक गोकटे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी लक्ष्मण पारधी, महादेव ढगे, बग्गी येथील सरपंच विजया प्रकाश चवाळे, जानराव टेवरे, रवी खंडेझोड, लक्ष्मण आयनर, रूपराव शेलोकार, प्रविण वासनिक उपस्थित राहणार आहे. यानंतर त्याचदिवशी रात्री 8 वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हास्यसम्राट डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचा भन्नाट विनोदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. याशिवाय 24 फेब्रुवारीला सायंकाळी 6.30 वाजता सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाला खासदार अमर काळे, माजी आमदार वीरेंद्र जगताप, विनोद काळमेघ, माजी जि.प. अध्यक्ष नितीन गोंडाने, पं.स. सदस्य अमोल होले, बंडूभाऊ यादव आदींची उपस्थिती राहणार आहे. याच दिवशी सायंकाळी 8 वाजता समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे शिष्य पंकजपाल राठोड महाराज यांचे कीर्तन होणार आहे. तरी या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन जय शिवाजी क्रीडा मंडळ, पळसखेड तर्फे करण्यात आले आहे.

# विचार वेध व्याख्यानमाला 27 फेब्रुवारीपासून

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि.20 ) –** दरवर्षी प्रमाणे यंदाही 27 फेब्रुवारी पासून स्थानिक भक्तीधाम येथे, तीन दिवसीय विचार वेध व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.सदर व्याख्यानमालेचे आयोजन श्री संत गुलाबराव महाराज सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालय,तथा श्री संत गुलाबराव महाराज सेवा संस्था बोराळा ( भक्तीधाम) व्दारे करण्यात आले आहे.

या व्याख्यानमालेचे आयोजन दरवर्षी सांस्कृतिक व सामाजिक प्रबोधनाची क्रिया गतीमान करण्याचे उद्देशाने, निद्रिस्त व निर्जीव समाज मनावर नवचैतन्याची फुंकर घालण्यासाठी करण्यात येते. या उपक्रमात यंदाही समाजातील ज्वलंत समस्यांचा वेध घेण्यासाठी,ही त्रिदिवसीय विचार वेध व्याख्यानमाला ठेवण्यात आली आहे.27 फेब्रुवारी पासून सुरू होणारी व्याख्यानमाला स्थानिक भाक्तीधामच्या श्री माऊली सभागृहात संपन्न होणार आहे.तीन ही दिवस दररोज सायंकाळी 6.30 वाजता व्याख्यानमालेला सुरवात होईल. गुरुवार 27 फेब्रुवारी ला अस्वस्थ महाराष्ट्र – दशा आणि दिशा , या विषयावर व्याख्यान मालेचे पहिले पुष्प गुंफण्यात येईल.या पुष्पा चे व्याख्याते पूणे येथील नामवंत लेखक व अभ्यागत डॉ.सुधिर भोंगळे हे असतील.या पहिल्या पुष्पाचे अध्यक्षस्थान माजी राज्यमंत्री बच्चू कडू हे भुषविणार आहे.28 फेब्रुवारी लाभ दुसऱ्या पुष्पा चे व्याख्याते शेतकरी आंदोलक व विचारवंत, नागपूर येथील चंद्रकांत वानखेडे हे असतील. गांधी – नेहरू आणि सांस्कृतिक वर्चस्ववाद या विषयावर ते आपले विचार मांडतील . या पुष्पाचे अध्यक्षस्थानी माजी पालकमंत्री अमरावती ?ड.यशोमती ठाकुर या असतील.तसेच व्याख्यानमालेचे तीसरे आणि शेवटच्या पुष्पाचे व्याख्याते, प्राध्यापक केशवराव ठाकरे अमरावती हे असतील. महाराष्ट्र धर्म व संस्कृती र्हास आणि जतन,या विषयावर ते मार्गदर्शन करतील. या पुष्पा चे अध्यक्षस्थान निवृत्त उप शिक्षणाधिकारी अमरावती राम पंडागळे हे भूषवतील.



# शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत शिवजयंती साजरी

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.20 ) –** स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शी येथे शिवजयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांनी अध्यक्षपद भूषविले. तर प्रमुख अतिथी आजीवन सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती नानासाहेब पाटील, माजी जि प सभापती श्रीपाद ढोमने, बबनराव पाटील , पर्यावरण मित्र हरिणारायन मालटे, पर्यवेक्षक मिलिंद ढाकुलकर, उद्धव गिद , कमलेश रोडे विठ्ठल गवई यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवरायांची आरती ओवाळण्यात आली शिवरायांच्या जयघोषात सम्पूर्ण शाळेचा परिसर दुमदुमून गेला. अनेक विद्यार्थी वक्त्यांनी जोरदार भाषणं दिलीत. शिवजयंती निमित्य अनेक विद्यार्थ्यांनी सुंदर सुंदर किल्यांच्या प्रतिकृती तयार करून आणल्यात. तसेच स्काऊट गाईड मेळाव्यात यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना मेडल देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच ऑलिम्पियाड परीक्षेत मेडल प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेमा नवरे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन दिनेश सुखदेव यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन राहुल घुलक्षे, कु प्रवीना बोहरपी ,वर्षा निंघोट, कु पद्मा बनकर, आश्लेषा जाधव ,कु अर्चना तराळे यांनी अतिशय सुंदर असे नियोजन केले होते. कार्यक्रमाला सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.



## विभागीय आयुक्तालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**अमरावती–** आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी उपायुक्त संतोष कवडे, राजेंद्र फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह अन्य अधिकारी–कर्मचारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# अचलपूर तालुक्यात अंगणवाडी सेविका, मदतनीसांची भरती

## अर्ज सादर करण्याची प्रक्रिया 17 फेब्रुवारीपासून




**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा,( दि.20 ) –** ग्रामीण भागातील चिमुकल्यांचे शारीरिक, सामाजिक, मानसिक आणि शैक्षणिक आरोग्य सुधारावे आणि सुदृढ पिढी निर्माण व्हावी, यासाठी शासनाचे प्रयत्न असून या प्रयत्नचाच एक भाग म्हणून तालुक्यात 21 अंगणवाडीसेविका व 6 मदतनीस अशा एकूण 27 जागा भरल्या जाणार आहे. अर्ज सादर करण्याची प्रक्रिया 17 फेब्रुवारीपासून सुरू झाली आहे. पात्र महिलांनी पंचायत समिती कार्यालयील बालविकास प्रकल्प कार्यालयात अर्ज सादर करावे, असे आवाहन बालविकास प्रकल्प अधिकारी भीमराव वानखडे यांनी केले आहे. सदर रिक्त जागांसाठी मेगाभरती प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. रिक्त असलेल्या पदांसाठी जाहीरनामाही प्रसिद्ध करण्यात आला असल्याचे बालविकास प्रकल्प अधिकारी वानखडे यांनी म्हटले आहे.

तालुक्यात 21 अंगणवाड्यां मध्ये सेविका आणि मदतनीस यांची पदे रिक्त आहे. त्यामध्ये मुकिंदपूर, वासणी खुर्द, चौसाळा, येवता, नारायणपूर, अंबाडा, नायगाव, बोर्डी, डोलार, कासमपूर, रामापूर, हरम, पोही, शिंदी, श्यामपूर, तुळजापूर, देवगाव, गोंडविहीर, सावळी दातुरा, कोल्हा, शहापूर या गावांचा समावेश आहे, तर तालुक्यातील 6 अंगणवाड्यांमध्ये मदतनिसांची पदे रिक्त आहे. त्यामध्ये भूगाव, खेलतपमाळी, देवरी, भिलोना, टवलार, दत्तझिरी या गावांचा समावेश आहे. पंचायतसमिती कार्यालय परिसरातील बालविकास प्रकल्प कार्यालयात 17फेब्रुवारीपासून अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख 4 मार्च 2025 असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. सर्व भरती प्रक्रिया पारदर्शकपणे करण्यात येणार आहे. सदर भरतीमध्ये काही एजन्ट सक्रिय होण्याची शक्यता असून प्रलोभने दाखवून फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रलोभने दाखविणाया एजेंटच्या भूलथापांना बळी पडू नये, जेणेकरून आर्थिक फसवणूक होणार नाही, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# मोर्शी तालुका काँग्रेसने केला कृषिमंत्र्यांच्या वक्तव्याचा निषेध

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.20 ) –** महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी अमरावती येथे कृषी प्रदर्शनीच्या उद्घाटन प्रसंगी शेतकऱ्यांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले. त्यांचे हे वक्तव्य शेतकऱ्यांचा अपमान करणारे असून कृषिमंत्री या महत्त्वाच्या पदावर बसलेल्या व्यक्तीला असे बोलणे शोभत नाही, अशी टीका करीत मोर्शी तालुका काँग्रेस समितीने कृषीमंत्र्यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध केला आहे.

अमरावती येथे कृषी मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्यांशी केली होती. आज भिकारी सुद्धा एक रुपया घेत नाही, पण आम्ही शेतकऱ्यांना एक रुपयात विमा दिला असे वादग्रस्त विधान त्यांनी केले होते. शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना हे शासनाचे कर्तव्य आहे. कुण्या मंत्र्याला स्वत:च्या खिशातून हा खर्च करावा लागत नाही. मंत्रिपदाची शपथ घेताना मी जनतेशी प्रामाणिक व एकनिष्ठ राहील अशी शपथ कोकाटे यांनी घेतली होती. आम्ही शेतकऱ्यांना विमा दिला या कोकाटे यांच्या विधानातून अहंकार प्रगट होतो. ते शेतकऱ्यांवर उपकार केल्याची भाषा बोलत असून ती पूर्णत: चुकीची आहे, असे काँग्रेस कमिटीने म्हटले आहे.



मुळात पीक विमा योजना हीच शेतकऱ्यांच्या हिताची नाही. केवळ विमा कंपन्यांचा फायदा त्यातून साधला जातो. पीक विम्याच्या प्रीमियम पोटी शेतकऱ्यांकडून वसूल केली जाणारी रक्कम आणि त्या तुलनेत शेतकऱ्यांना मिळालेली नुकसान भरपाई अत्यंत नगण्य आहे. त्यातच पीक विमा कंपन्यांच्या मुजोर कारभाराचाही शेतकऱ्यांना सामना करावा लागतो, असा आरोप काँग्रेस कमिटीने केला आहे. शेतकरी केंद्रबिंदू मानून राज्याचे कृषी धोरण राबवित असल्याचा दावा करणाऱ्या कृषी मंत्र्यांना शेतकऱ्यांच्या समस्या दिसत नाहीत. ठिबक सिंचन, तुषार सिंचनच्या अनुदानाचे पैसे गेल्या दोन वर्षांपासून दिले गेले नाही. त्याकडे त्यांचे लक्ष नाही. नॅनो युरिया व डीएपी वाटपात मोठा घोळ झाला आहे, त्याकडे लक्ष देण्याऐवजी कृषिमंत्री शेतकऱ्यांचा अपमान करतात, हे निषेधार्ह असल्याची टीका काँग्रेसचे मोर्शी तालुका शहर अध्यक्ष भूषण कोकाटे यांनी केली आहे.

# गुजरी बाजारातील टिनशेडचे अतिक्रमण हटविले

## अचलपूर नगरपालिकेची अतिक्रमणविरोधी कारवाई





**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि.20 ) –** परतवाडा शहरातील गुजरी बाजार परिसरात नगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाने आज 11 वा. सुमारास अतिक्रमण हटविण्याची कारवाई करत मार्गावरील फ्रुट मार्केट आणि दुकानांच्या बाहेर वाढवलेले टिनशेड हटवले. या कारवाईमुळे बाजार परिसरातील वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अतिक्रमणांवर नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. ही गुजरी बाजार पासुन मिश्रा लाईन पर्यंत बैतुल रोड व इतरत्र अतिक्रमण हटविण्यात आले आहे. नगरपालिकेच्या पथकाने ही कारवाई सरमसपूरा परतवाडा ठाणेदार व पोलिसांच्या सुरक्षेच्या संरक्षणात केली. काही व्यापाऱ्यांनी अतिक्रमण हटविण्यास विरोध दर्शवला, मात्र प्रशासनाने ठाम भूमिका घेत कारवाई पूर्ण केली. नगरपरिषदेचे प्रशासक आणि मुख्याधिकारी धिरज गोहाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली. तसेच बांधकाम अभियंता अरविंद गोठवाल, किटुकले व कर विभागाचे कर्मचारी आणि इतर अधिकारी यावेळी उपस्थित होते. गुजरी बाजार परिसरात अनेक व्यापारी फुटपाथ आणि मुख्य रस्त्यांवर अतिक्रमण करून व्यवसाय करत होते. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होण्यासह नागरिकांना चालण्यासही अडचण येत होती. यासंदर्भात वारंवार तक्रारी आल्याने प्रशासनाने कडक पाऊल उचलत ही कारवाई केली. नगरपालिकेने व्यापाऱ्यांना पूर्वसूचना देऊनही अतिक्रमण न हटवल्याने सरकारी जागेवरील अनधिकृत बांधकामे आणि टिनशेड काढण्याची कारवाई हाती घेण्यात आली. प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला आहे की, अतिक्रमण हटवल्यानंतर पुन्हा अनधिकृत बांधकाम आढळल्यास कडक कारवाई केली जाईल. तसेच, सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण केल्यास दंडात्मक कारवाईस सामोरे जावे लागेल.

नगरपालिकेच्या या मोहिमेमुळे गुजरी बाजार परिसर सुटसुटीत झाला असून, रहदारीला मोठा दिलासा मिळाला आहे. प्रशासनाने नागरिक आणि व्यापाऱ्यांनी सहकार्य करून शहर स्वच्छ आणि अतिक्रमणमुक्त ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# पी.आर.पोटे पाटील कॉलेजच्या विद्यार्थ्यांची गगन भरारी



## भारतकॉन 2025 मध्ये निवड

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 20 ) –** पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती येथील बी.फार्म च्या चौथ्या वर्षाला प्रवेशित आदित्य दुधे व वैष्णवी देवघर तसेच तिसऱ्या वर्षाला प्रवेशित देवश्री बनासरे यांनी संयुक्तपणे निम व टरमरिक इनफ्यूज स्प्रे या विषयावर अत्यंत उपयुक्त अशी स्टार्ट अप योजना ढ्ढष्ठश्वड्डञ्जश्व 2.0 मध्ये सादर केली. त्यामुळे त्यांची निवड पहिल्या पाच स्टार्टअप मध्ये झाली (दि.19)आहे.

IDEATE 2.0 ही स्पर्धा संत गाडगेबाबा विद्यापीठ रिसर्च अँड इनक्यूबेशन सेंटर व अमरावती मॅनेजमेंट असोसिएशन यांनी संयुक्तपणे आयोजित केली होती. त्यांना 22 फेब्रुवारी रोजी आयोजीत भारतकॉन 2025 या स्पर्धेत संत गाडगेबाबा विद्यापीठातर्फे स्टार्टअप सादर करण्याची संधी मिळाली आहे.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी त्यांच्या स्टार्टअपसाठी अथक परिश्रम घेतले तसेच त्यांना पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी च्या प्राचार्या डॉ. दिप्ती रुईकर व संशोधन विभाग प्रमुख डॉ. भूषण भोयर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# ग्रामीण भागात शिकवणी वर्गांचा सुळसुळाट

## नियमांची पायमल्ली, नोंदणी न करता शासनाला चुना



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.20 )** – शहरांसोबतच ग्रामीण भागातही खाजगी शिकवणी वर्गांचा सुळसुळाट झाल्याचे पाहायला मिळत असून शासकिय नियमांची सर्रास पायमल्ली करुन हे शिकवणी वर्ग बिनबोभाट सुरु आहेत. बहुतांश शिकवणी वर्गांनी नोंदणीच केली नसून त्यांच्याकडून शासनाची दिशाभूल केली जात आहे. या गंभीर प्रकाराकडे प्रशासनातील संबंधित अधिकार्यांचे पूर्णत: दुर्लक्ष आहे.

शिकवणी वर्गाच्या नियमनासाठी केंद्रीय उपभोक्ता संरक्षण प्राधिकरणाने 16 जानेवारी 2024 रोजी जारी केलेल्या दिशानिर्देशाला कोचिंग क्लासेस संचालकांनी केराची टोपली दाखवली असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. नियम धाब्यावर बसवत नोंदणी न करता अनेक शिकवणी वर्ग बिनबोभाट सुरू असून, मुलभूत सोयीसुविधा व विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकार्यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. शहरातील गल्लीबोळात शिकवणी वर्गाचे पीक आले आहे. नियमानुसार आता शिकवणी वर्ग सुरू करण्याआधी तीन महिन्यांत संबंधित शिकवणी वर्गाच्या संचालकाला केंद्रीय उपभोक्ता संरक्षण प्राधिकरणाकडे नोंदणीसाठी अर्ज करावा लागतो. या अर्जासोबत शिकवणी वर्गाच्या इमारतीचे बांधकाम मूल्यमापन, अग्निरोधक मूल्यमापन प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. सोबतच शिकवणी वर्गात शिकवणारे शिक्षक हे पात्रताधारक असणे आवश्यक आहे.

मात्र, शहरात चक्क 16 वर्षाखालील मुलांना शिकवणी वर्गात प्रवेश दिला जात असल्याचे वास्तव समोर आले आहे. वर्गात प्रथमोपचार किट, सीसीटीव्ही कॅमेरा, वैद्यकीय हेल्पलाईन, दर्शनी भागात लावलेला नंबर याची कोणतीही सोय नसल्याने हे शिकवणी वर्ग की कोंडवाडे? असा प्रश्न निर्माण झाला आहे. कोचिंग क्लासेस नियमानुसार चालत नसतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी सक्षम प्राधिकारी असतात. अचलपुर, परतवाडा, अंजनगाव शहरासह काही गावात शासकीय सेवेत असणारे शिक्षक हे शिकवणी वर्ग चालवत आहेत. विद्यार्थ्यांकडून घेतलेले शुल्क लाखोंच्या घरात असल्याने याकडे आयकर विभागाने लक्ष देण्याची गरज आहे. या वर्गात सुरक्षेचे कोणतेही नियम पाळले जात नसल्याचे मोठा अपघात घडला तर जबाबदार कोण? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### 16 वर्षाखालील मुलांना प्रवेश गुन्हा

16 जानेवारी 2024 रोजी केंद्रीय उपभोक्ता संरक्षण प्राधिकरणाच्या सचिव निधी खरे यांनी देशातील कोचिंग क्लासेसला दिशानिर्देश जारी केले होते. यामध्ये 16 वर्षाखालील मुलांना शिकवणी वर्गात प्रवेश देणे गुन्हा ठरवला गेला. यामध्ये दोषी आढळल्यास बालक शोषण प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करण्यात येऊन एक लाख रुपये दंड केला जातो. तसेच शिकवणी वर्गाचे शुल्क, विद्यार्थी संख्या व कोठे, कधी नोंदणी झाली, याचा तपशील दर्शनी भागात लावणे बंधनकारक आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष व्यवस्था असावी तसेच बोर्डावर मान्यताप्राप्त मंजूर शब्द न वापरता फक्त नोंदणीकृत शब्द वापरून त्याचा नोंदणी क्रमांक लिहिणे अनिवार्य आहे.



# कौंडण्यपूर कॉरिडॉर लवकरच अस्तित्वात येणार!

- अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचा संकल्प
- आर्किटेक्कर टीमसह संपूर्ण नदी परिसराची पाहणी

**अमरावती सवेरा ब्यूरो**

**अमरावती, ( दि. 20 )** – कौंडण्यपूर कॉरिडॉर लवकरच अस्तित्वात येणार असून अंबा रुख्मिणी महोत्सव समितीच्या संकल्पानुसार आर्किटेक्कर टीमसह संपूर्ण नदी परिसराची पाहणी (दि.15) करण्यात आली आहे.

विदर्भाची पुरातन राजधानी व माता रुख्मिणीचे माहेरघर असलेल्या अमरावती जिल्ह्यातील श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे जगप्रसिद्ध भव्य कॉरिडॉर निर्मितीसाठी अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचे अध्यक्ष रविराज देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी रेटून धरली होती. मुख्यमंत्री महोदयांनी तात्काळ दखल घेत कौंडण्यपूर कॉरिडॉर साठी स्वत: लक्ष देईल, व लवकरच त्याला मंजुरी सुद्धा देण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता. आणि याच पार्श्वभूमीवर (दि.15) तज्ज्ञ आर्किटेक्कर टीमसह सह रविराज देशमुख यांनी कौंडण्यपूर येथील संपूर्ण नदी परिसराची बोटीने प्रवास करत पाहणी केली. यावेळी कौंडण्यपूर कॉरिडॉरसाठीचा मोठा आराखडा लवकरच तयार करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी आर्किटेक्कर टीमच्यावतीने देण्यात आले. यावेळी कौंडण्यपूर येथील श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर व श्री अंबिका देवी मंदिर येथे भेट देऊन दर्शन घेतले. तसेच आर्किटेक्कर टीम चा शाल श्रीफळ व पुष्पवृक्ष देऊन यावेळी सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर ओबीसी मोर्चा प्रदेश महामंत्री गजाननराव कोल्हे यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला.

### कौंडण्यपूर होणार मोठे पर्यटनस्थळ– रविराज देशमुख

विदर्भाची पुरातन राजधानी, माता रुख्मिणीचे माहेरघर तसेच कुलस्वामिनी श्री अंबिका मातेचे शक्तीपीठ आणि नयनरम्य असे नैसर्गिक सौंदर्य लाभलेले अमरावती आणि वर्धा जिल्ह्याच्या सीमेवर श्री क्षेत्र कौंडण्यपूर हे ऐतिहासिक स्थळ आहे. मात्र अजूनही विकासापासून वंचित आहे, याठिकाणी पाहिजे तसा पर्यटक वर्ग अजूनपर्यंत पोहोचू शकला नाही. त्यामुळे या तीर्थक्षेत्रात जगप्रसिद्ध कॉरिडॉर साकारण्याचा संकल्प आमच्या अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचा आहे. आणि त्यादृष्टीने आम्ही राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव टाकला असून त्यांनी स्वत: यामध्ये सहभागी राहून कॉरिडॉर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्याची सुरुवात म्हणून आर्किटेक्कर टीमसह संपूर्ण नदी परिसराची पाहणी केली. आता लवकरच कौंडण्यपूर कॉरिडॉरचा एक मोठा आराखडा तयार करण्यात येईल आणि त्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे तसेच राज्य शासनाकडे सुद्धा आम्ही पाठवू, त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन त्यांना सुद्धा हा प्रस्ताव सादर करू, अशी प्रतिक्रिया यावेळी अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचे अध्यक्ष रविराज देशमुख यांनी दिली. यावेळी श्यामभाऊ नारखेडकर, उमेशभाऊ श्रीखंडे, ह. भ. प. संजय महाराज ठाकरे, संतोष मठिये, सरपंच प्रेमदास राठोड, गजाननराव बांबल, आशिष डुबे, विनायकराव कडू, अशोकराव जयस्वाल, श्रीराम पुंडेकर, प्रशांत कडू, पांडुरंगजी सराडे, कैलास कुर्हेकर, सुभाषराव अर्मळ, सुभाषराव खंडारे, प्रल्हाद केवदे, संदीप सोटे, गणेश सुधाकर केवदे, संदीप सोटे, गणेश बांबल, नामदेवराव मेहकर, प्रदीप डुबे, जानरावजी केवदे, सुधाकर केवदे, स्वप्नील केवदे यांच्यासह ग्रामस्थ व पदाधिकारी उपस्थित होते.

## टी.जी. कावलकर व्याख्यानमालेचे आयोजन 21 ला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.20 )** – विद्यार्थ्यांना अत्याधुनिक संशोधनांबाबत माहिती मिळावी, या उद्देशाने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्यावतीने दि. 21 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वा. टी.जी.कावलकर व्याखानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रमुख अतिथी तथा वक्ते म्हणून बरकतुल्ला विद्यापीठ, भोपाळ येथील जेनेटिक्स विभागाचे प्रोफेसर एमेरिटस तथा प्रख्यात वनस्पती अनुवंशशास्त्रज्ञ प्रो. एच. के. गोस्वामी राहणार असून 'मानवी गुणसूत्रांवर उत्क्रांती, आण्विक साइटोजेनेटिक्स, क्रोमोसोम आणि मॅग्नेटिझम' विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करणार आहे. अध्यक्षस्थानी माजी प्र–कुलगुरू व माजी विभागप्रमुख डॉ.जे.ए. तिडके राहतील. सर्व विद्यार्थ्यांनी व्याख्यानमालेस उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार यांनी केले आहे.

# मातोश्री गौराबाई गुढे आश्रमशाळेत निरोप समारंभ

**महासागर प्रतिनिधी**

**भातकुली,( दि.20 )**– मातोश्री गौराबाई गुढे अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आदिवासी आश्रमशाळा, भातकुली येथे वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप (दि.17) देण्यात आला.

निरोप समारंभा करिता प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार तथा मातोश्री बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था, अमरावती चे अध्यक्ष अनंत गुढे व आयटीआय कॉलेजचे माजी प्राचार्य अरविंद लोखंडे, आदिवासी आश्रमशाळेच्या माध्यमिक विभागांच्या मुख्याध्यापिका डॉ. संगीता शिंदे तसेच प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रवीण जायदे हे मान्यवर उपस्थित होते.




येत्या 21 फेब्रुवारीपासून वर्ग दहावीची शालांत परीक्षा सुरू होत आहे, त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधी माहिती तसेच त्यांना शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांनी ध्येयनिश्चिती करून त्याकडे वाटचाल करायला हवी, असे संस्थेचे अध्यक्ष अनंत गुढे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच शाळेच्या माध्यमिक मुख्याध्यापिका डॉ. संगीता शिंदे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधी भीती बाळगू नका व परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जा, असे सांगितले. कार्यक्रमाला विशेष उपस्थित अरविंद लोखंडे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेचे महत्त्व सांगितले. शाळेचे प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रवीण जायदे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. मातोश्री गौराबाई गुढे अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आदिवासी आश्रम शाळा, भातकुली येथे वर्ग पहिली पासून शिक्षण घेत असलेल्या व आता दहावी परीक्षा देणारे विद्यार्थी गणराज कासदेकर व विद्यार्थिनी गौरी ठाकरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी शाळेविषयीचे अनुभव उपस्थित विद्यार्थ्यांसमोर मांडले.

कार्यक्रमाकरिता शाळेतील प्राथमिक व माध्यमिक विभागाचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी अल्पोपहाराचा आस्वाद घेतला. कार्यकमाचे संचालन शाळेतील शिक्षिका श्वेता पांडे यांनी केले.

# हिवरखेड येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड, ( दि.20 )**– मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथील ग्राम वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवजयंती निमित्त वाचनालयात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाला वाचनालयाचे अध्यक्ष नानासाहेब धरमकर, सचिव साहेबराव निंभेकर, कोषाध्यक्ष साहेबराव पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन व पुष्पहार घालून वंदन करण्यात आले.

साहेबराव निंभेकर यांनी आपल्या भाषणातून शिवाजी महाराज यांच्या जीवनातील विविध प्रसंग सांगून त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. वाचनालयाचे ग्रंथपाल अनंत फांजे, लिपिक पंकज भडके, भूषण बेलसरे यांच्यासह गावातील नागरिक यावेळी उपस्थित होते. प्रसाद वितरणाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# महसूल अधिकाऱ्यांच्या गावभेटी देवून मुक्काम

## शासनाचे विशेष अभियान राबविले ● वरुड व मोर्शी तालुक्यातील गावकऱ्यांशी संवाद



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.20 )**– गावनिहाय क्षेत्रिय भेटी देवून तेथे मुक्कामी राहण्याचे अभियान राबविण्यात यावे, असे आदेश शासनातर्फे देण्यात आले आहे. त्यानुसार मोर्शी व वरुड महसूल उपविभागातील अधिकार्यांनी अनेक गावांना भेटी दिल्या आणि तेथे मुक्काम केला. या भेटी व मुक्कामादरम्यान अधिकार्यांनी गावकर्यांशी संवाद साधून शासकिय योजनांची माहिती दिली.

क्षेत्रीय शासकीय व निम शासकीय कार्यालयांसाठी शंभर दिवसाचा कृती आराखडा ठरविण्यात आला असून 29 जानेवारी 2025 चे शासकीय परिपत्रकानुसार क्षेत्रीय अधिकार्यांना गावभेटी व गाव मुक्काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार क्षेत्रीय महसुली अधिकार्यांनी क्षेत्रीय भेटी व गाव मुक्काम अभियानाचे नियोजन केले आहे. 18 फेब्रुवारी 2025 ला उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार आणि मंडल अधिकारी यांनी मोर्शी तालुक्यातील नशीरपूर, हिवरखेड, मायवाडी, शिरखेड, गोराळा, शिरलस, वाघोली, लिहिदा, दुर्गवाडा, पाळा, आष्टगाव आणि दाभेरी या गावांमध्ये तर वरुड तालुक्यातील महेंद्री, धनोडी, जामठी गणेशपुर, गाडेगाव, तिवसा घाट, टेंभुरखेडा, मुसलखेड, पिपलागड, जामगाव, सातनूर व कुरळी या गावांमध्ये मुक्कामी राहण्याचे नियोजन केले होते. सदर गाव मुक्कामादरम्यान उपविभागीय अधिकारी प्रदीप पवार यांनी वरूड तालुक्यांतील महेंद्री या गावाला भेट देऊन मुक्काम केला. या गावातील कार्यालयाच्या कामकाजाची पाहणी केली. शासकीय योजनांची अंमलबजावणी व्यवस्थित होते किंवा नाही याची खातरजमा केली. नागरिकांशी सुसंवाद साधून त्यांना येत असलेल्या विविध अडचणी जाणून घेतल्या. सदर क्षेत्रीय ग्राम भेटी व गाव मुक्कामाचे दरम्यान नागरिकांनी विविध कल्याणकारी योजना प्राप्त करताना येत असलेल्या अडचणी उपविभागीय अधिकार्यांसमक्ष मांडल्यात.

# जिल्हा ग्रामीण पोलीस विभागात खांदेपालट होण्याचे संकेत?

## ठाणेदार लागले 'हॅप्पी एंडींग' च्या मागे

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.20 )**– ग्रामीण पोलीस दलात ज्या ठाणेदारांना त्यांच्या कार्यस्थळी दोन ते तीन वर्ष झाले आहेत, त्या ठाणेदारांची खांदेपालट होण्याचे संकेत आहे. यामध्ये स्थानिक गुन्हेशाखेसह अनेक ठाण्यांचा समावेश आहे. त्यामूळे बदली च्या अगोदर त्या ठिकाणी आपल्या कार्याचा आपल्याचकरिता 'हॅप्पी एंडीग' ठरावा याकरिता अवैध व्यावसायिकांचे हात मोकळे सोडले असल्याचे दिसत आहे. महाराष्ट्र–मध्यप्रदेशाच्या सिमेसह बहुतांश ठिकाणी अवैध व्यावसायिकांवर होणाऱ्या कारवाया थांबल्याचे दिसत आहे.



अमरावती जिल्हा मध्यप्रदेश ला लागून असल्याने मध्यप्रदेश मधून मोठ्या प्रमाणात कत्तलीसाठी गोवंश तस्करी , गुटखा तस्करी, सागवान तस्करी, वाळू तस्करी, गावठी व अवैध दारूची वाहतूक केली जात आहे. या तस्करांवर नियमित कारवाई होणे आवश्यक असताना मागील काही महिन्यांपासून ही कारवाई अचानक थांबल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्याचा चांगला अभ्यास असताना देखील तत्कालीन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक तपन कोल्हे यांच्या कार्यकाळात उल्लेखनीय कारवाया होवू शकल्या नाही. त्यानंतर गुन्हे शाखेच्या प्रमुखपदी वाशिमवरुन आलेले पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांना नियुक्त करण्यात आले. किरण वानखडे यांचा सुरवातीचा कार्यकाळ वाखणण्याजोगा होता. अनेक महत्वपुर्ण कारवाया स्थानिक गुन्हे शाखेकडून करण्यात आल्या. मात्र आता या कारवायांचा जोर अचानक मंदावल्याचे पहायला मिळत आहे. त्यांना दोन वर्षाहून अधिक कालावधी येथे होत आला आहे. या लाटमध्ये कदाचित त्याचीही बदली होवू शकते. बदली होऊन देखील बदलीच्या ठिकाणी न जाता अमरावती ग्रामीण पोलीस दलातील 5 पोलीस निरीक्षक मॅट मध्ये गेले आहे. ही घटना जिल्ह्यातील पहिली घटना आहे. तर जिल्हा मुख्यालयमध्ये दोन ठिकाणी एकच पोलीस निरीक्षक काम करत आहे. तत्कालीन पोलीस अधीक्षक लखमी गौतम यांच्या वेळी वरुड पोलीस स्टेशन ठाणेदार म्हणून असलेले अर्जुन ठोसरे यांना परत वरुड पोलीस स्टेशन देण्यात आले, त्यामूळे त्यांनाच पुन्हा का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. वाढलेल्या अवैध व्यवसायांवर कारवाईच्या प्रकाशाचा 'किरण' जोपर्यंत पडणार नाही, तो पर्यंत ठाणेदार 'ऑल इज वेल' म्हणत गाडा हाकत राहतील.

### अनेक ठाणेदार म्हणतात विच्छा माझी पुरी करा?

खांदेपालट होत असताना आपली स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक पदी वर्णी लागावी या उद्देशाने अनेकजण गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहे. तर काहीजण वरिष्ठांशी वशिला लावत 'विच्छा माझी पुरी करा?' असे म्हणत तशी फिल्डिंगही लावत असल्याचे दिसत आहे.

### चौकशींची पेंडेंसी ?

पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांनी काही महिन्यांपुर्वी परतवाडा पोलीस स्टेशनला भेट देत त्या ठिकाणी ठाणेदारांमध्ये सुरु असलेल्या 'संगीत खुर्ची' प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश पोलीस उपविभागीय अधिकारी शुभमकुमार यांना दिले होते. दुसरीकडे शिरजगाव कसबा पोलीस स्टेशन मधील युवकाला मारहाणप्रकरण, पोलीस उपनिरीक्षक शिंदे, कर्मचारी मनोज पंडित यांची चौकशी सुद्धा वरिष्ठ स्तरावर पेंडेसी आहे.

### देउरवाडा बिटचा कारभार रामभरोसे

देऊरवाडा बिट मध्ये मोठ्या प्रमाणात अवैध धंदे जोरावर असून अवैध गावठी दारू, विदेशी दारू, अवैध वाळू, वरली मटका , गुटखाविक्री हे रोखण्याचे आव्हान नव्याने आलेले बिट अंमलदार पंडित यांना राहणार आहे.




# मानवसेवा पॅरामेडिकलच्या विद्यार्थ्यांचे योगासन स्पर्धेत सुयश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.20 )**– छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात जिल्हास्तरिय खुली योगासन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत अंजनगाव सुर्जीच्या लड्ढा कॅम्पस, महेश नगर येथील मानवसेवा पॅरामेडिकल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होवून चमकदार कामगिरी केली व पदके प्राप्त केलीत.

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, बृहन महाराष्ट्र योग परिषद व स्वराज्य सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत डॉ. नंदकिशोर पाटील, डॉ. अक्षय चौधरी आणि महानंदा गजबे यांनी सुवर्णपदक पटकावले. प्रिया पाटील, अद्वय डबीर यांन रौप्य पदक तर डॉ. अनिता कुर्मवंशी, साक्षी पाटील, आदित्य मुरकुटे यांना कास्य पदक प्राप्त झाले. सारिका धामोळे यांनी चौथा क्रमांक प्राप्त केला. परी धामोळे हिनेही उत्कृष्ठ योगासनांचे प्रात्याक्षिक केले. विजेत्यांना बृहन महाराष्ट्र योग परिषदेचे विशाल खोडस्कर, संदीप मंडाले व स्वराज्य सेवा प्रतिष्ठानचे धनराज अढाऊ, चेतन बेलसरे यांच्या हस्ते पूरस्कार वितरित करण्यात आले. या यशाबद्दल महाविद्यालय आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.

# पाणी टंचाई : यंदा 17 कोटी 37 लाख रुपये करणार खर्च?

## 707 गावांमध्ये 1,034 उपाययोजना प्रस्तावित | जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीची प्रतीक्षा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )**– मागील वर्षी 21 कोटींच्या घरात पाणीटंचाईचा आराखडा तयार करण्यात आला असताना यंदा यामध्ये सुमारे 4 कोटींचे नियोजन कमी करण्यात आले आहे. यंदा अंदाजे 707 गावांमध्ये 1,034 उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

याकरिता 17 कोटी 37 लाख 19 हजार रुपयांचा खर्च अपेक्षित असून सदर आराखड्याला मंजुरीकरिता जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्या मंजुरीनंतर उर्वरीत दोन टप्प्यातील टंचाई निवारणार्थ आराखड्याची अंमलबजावणी सुरू होणार आहे. जिल्हापरिषदेच्या जिल्हा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या वतीने दरवर्षी ऑक्टोबर ते डिसेंबर, जानेवारी ते मार्च व एप्रिल ते जून अशा तीन टप्प्याचा पाणीटंचाई निवारणार्थ आराखडा तयार करून यावर जिल्हाधिकारी यांची मंजूरात घेतली जाते. हा आराखडा सप्टेंबरमध्येच तयार करणे अपेक्षित आहे; परंतु यंदा केवळ पहिल्याच टप्प्याचा आराखडा तयार करण्यात आला होता. जानेवारीपासूनचा

आराखड्याला डिसेंबरमध्ये जिल्हाधिकारी यांची मंजुरात घेणे अपेक्षित असताना फेब्रुवारी सुरू होऊन 17 दिवस लोटले आहे. अद्यापही जिल्हाधिकारी यांची या आराखड्याला मंजुरात मिळाली नाही. पंचायतसमिती स्तरावर आमदारांच्या बैठकांअभावी सदरचा आराखडा रखडल्याचे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून सांगितले जात आहे. पं. स. च्या नियोजनाअभावी तब्बल तीन महिने उशिरा नियोजन करून जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेकरिता पाठविला आहे. यंदा नियोजनामध्ये तब्बल 4 कोटींची कपात करण्यात आली आहे. मागील वर्षी 21 कोटी 18 लाखांचे नियोजन करण्यात आले होते; मात्र 17 कोटी 37 लाख 19 हजारांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे प्रत्यक्षात कोणत्या खर्चामध्ये कपात केली, हे कळायला मार्ग नाही.

### 483 विहिरींचे करणार अधिग्रहण

टंचाईग्रस्त गावांमध्ये पाण्याची दाहकता वाढल्यास अशा गावांमध्ये खासगी विहिरींचे अधिग्रहण करून पाणीपुरवठा केल्या जातो. यंदा जिल्ह्यात 483 विहिरींचे अधिग्रहण केले जाणार आहे. धारणी तालुक्यात सर्वाधिक 86, तर वरूड तालुक्यात 83 गावांमध्ये विहिरींचे अधिग्रहण केले जाणार आहे. दर्यापूर तालुका वगळता सर्वच तालुक्यांत खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात येणार आहे.

### 29 गावांमध्ये टँकरने होणार पाणीपुरवठा

जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही 29 गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करावा लागणार आहे. धारणी तालुक्यात सर्वाधिक 24 गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आराखड्यात करण्यात आले. त्यापाठोपाठ अमरावती तालुक्यात 4, तर चांदूररेल्वे तालुक्यातील एका गावाचा समावेश आहे.

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा आज दौरा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.20 )** – पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे शुक्रवार,दि. 21 फेब्रुवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यानुसार, बावनकुळे यांचे शुक्रवारी सकाळी 11.30 वाजता शासकीय विश्रामगृह, अमरावती येथे आगमन होईल. त्यानंतर शासकीय विश्रामगृहात दुपारी 12.30 वाजता पत्रकार परिषद घेतील. दुपारी 1.30 वाजता पंचवटी येथील सिंचन भवनात पाणी आरक्षण, कालवा सल्लागार समिती बैठक घेऊन जलसंपदा विभागाचा आढावा घेतील. दुपारी 2.30 वाजता जिल्हा परिषद कार्यालयात जिल्हा परिषदेचा आढावा घेतील. दुपारी 3.30 वाजता मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयात सार्वजनिक बांधकाम विभागाचा आढावा घेतील. दुपारी 4.30 वाजता महानगरपालिका सभागृहात महानगरपालिकेचा आढावा घेतील. सायंकाळी 5.30 वाजता शासकीय विश्रामगृहात जनतेच्या भेटी घेऊन लेखी निवेदने स्विकारतील. सायंकाळी 6.30 वाजता पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा, रात्री 8 वाजता स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा करतील.



# जय बजरंग क्रीडा मंडळाने मारली बाजी

## 55 किलो गटातील कबड्डी स्पर्धा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.20 )** – रुख्मिणी नगर स्थित मराठा फ्रेन्डस क्लब अमरावती तर्फे छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती निमित्त व स्व गोलू उर्फ तुषार शंकरराव शिरसकर स्मृतिप्रित्यर्थ 55 किलो गटातील कबडडी स्पर्धा दि 18 व 19 फेब्रुवारी 2025 रोजी मंडळाच्या मैदानावर पार पडल्या.

या स्पर्धेत 27 संघ सहभागी झाले. दोन दिवसात एकुण 34 मॅच घेण्यात आल्या. अंतीम सामना जय बजरंग क्रीडा मंडळ



(कारंजा जि. वाशीम) विरुद्ध बालविर क्रीडा मंडळ (अमरावती) मध्ये झाला. दोन्ही संघाची मॅच मध्यंतरापर्यंत 9 – 9 गुण घेऊन सामना बरोबरीत होता. अंतीम गुणमध्ये बालविर क्रीडा मंडळाला 18 व जय बजरंग क्रीडा मंडळ 16 असा हा सामना झाला. यामध्ये 2 गुणांनी बालविर क्रीडा मंडळ विजयी झाले.

# रानडुकराचा तीन युवकांवर हल्ला

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.20 )**– खिरपाणी येथे रानडुकराच्या हल्ल्यात तीन युवक गंभीर जखमी झाल्याची घटना मंगळवारी सायंकाळी 6:30 वाजताच्या सुमारास घडली. जखमींवर अंजनगाव येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. गोपाल हराळे हे आपल्या शेतातून पिकाला पाणी लावून घरी परत येत असताना अचानक रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला. त्याचवेळी खिरपाणी येथून हिरापूरकडे



जाणाऱ्या दोन युवकांच्या दुचाकीला रानडुकराच्या कळपाने जोरदार धडक दिली. या अपघातात दोन्ही युवक गंभीर जखमी झाले. गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन तिघांनाही ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी अचलपूर येथे हलविण्यात आले. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण ग्रामीण भागात रानडुकरांसह रोही, हरणे आणि अस्वल यांसारख्या जंगली प्राण्यांचा वावर वाढला आहे. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांसह वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांनाही जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. महावितरणकडून रात्रीच्या वेळी वीजपुरवठा सुरू असल्याने शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी रात्री शेतात जावे लागते. त्यामुळे अशा जंगली प्राण्यांच्या हल्ल्याचा धोका वाढला आहे. या आधीही अनेक शेतकरी आणि वाहनधारक रानडुकरांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झाले असून काहींना प्राणही गमवावे लागले आहेत.

# श्रींचा प्रकट दिन उत्साहात



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि. 20 )** – शहरात 'श्री संत गजानन' महाराजांचा 147 वा प्रगट दिन सोहळा मोठ्या थाटामाटात भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला . यासाठी मोठ्या संख्येत भाविक श्री. संत गजानन महाराज मंदिरात दाखल झाले होते. गुरुवारी येणारा प्रकट दिन दुग्धशर्करा योग मानल्या जात असल्याने आज अनेक ठिकाणी भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. अभिषेक, महापूजा, गजानन विजय सामुदायिक ग्रंथ वाचन, आरती, भजन, प्रवचन, कीर्तन आदी कार्यक्रम झाले. असंख्य भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



# मेळघाटातील जरिदा उपकेंद्रासाठी परवानगी द्या!

## खा. वानखडे यांची वन मंत्र्याशी चर्चा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )** – जिल्ह्यातील मेळघाटात वसलेल्या दुर्गम गावांमध्ये अद्याप वीज पोहोचलेली नाही. त्यामुळे खासदार बळवंत वानखडे यांनी या परिसराला वीज देण्यासाठी जरिदा गावात 33 केव्ही वीजवाहिनी टाकण्यासाठी उपकेंद्र उभारणीसाठी तातडीने परवानगी द्यावी, अशी मागणी वनविभागासह पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्याकडे( दि.20) केली.

वन व हवामान बदल मंत्र्यांशी झालेल्या चर्चेत खासदार वानखडे म्हणाले, मेळघाट परिसरातील नागरिकांना वीज पुरवठ्याची गंभीर समस्या भेडसावत आहे. ही समस्या सोडवण्यासाठी जरिदा उपकेंद्रापर्यंत 33 केव्ही वीजवाहिनी बांधण्याची योजना प्रस्तावित आहे. या प्रस्तावित वीजवाहिनीसाठी वनविभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला असून, प्रस्तावही पाठविला आहे. या प्रस्तावासाठी वनविभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे, जेणेकरून 33 के व्ही जरिदा उपकेंद्रापर्यंत पोहोचू शकेल. वीज वाहिन्या सहज बांधता येतात. आणि या भागातील ग्रामस्थ, शेतकरी, आरोग्य केंद्रे, शैक्षणिक संस्था आणि इतर अत्यावश्यक सेवांना अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करता येईल.

जरिदा पॉवर लाईनचा काही भाग वनक्षेत्रातून जातो. त्यामुळे हा प्रकल्प राबवण्यासाठी वनविभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे. हे काम पूर्ण करताना या प्रकल्पादरम्यान पर्यावरणाचा समतोल राखला जाईल आणि वन्यजीव संरक्षण कायदा आणि पर्यावरणविषयक मार्गदर्शक तत्त्वांचे पूर्णपणे पालन केले जाईल, याची काळजी घेण्यात आली आहे.



त्यामुळे जनहित, प्रादेशिक विकास आणि मूलभूत सुविधांची उपलब्धता लक्षात घेऊन वनविभागाकडून तातडीने परवानगी द्यावी, अशी मागणी खासदार वानखडे यांनी केली.





*अमरावती– येथील समर्थ कॉलनी व विवेकानंद कॉलनी परिसरात संत गजानन महाराज प्रकट दिनानिमीत्त पालखी यात्रा काढण्यात आली होती. यावेळी मंदिराची अतिशय सुंदर सजावट करण्यात आली होती. तसेच परिसरातील भाविक भक्तांनी आपआपल्या घरासमोर अतिशय सुंदर रांगोळ्या रेखाटल्या होत्या. दिंडी पताकांनी संपुर्ण परिसर भक्तीमय झाले होते.*

# महाराष्ट्र गर्व्हमेंट नर्सेस असोसिएशनचा एक दिवसीय संप




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.20 )**– पदोन्नतीसह अनेक मागण्या प्रलंबित असल्याने गुरूवारी (दि.20) महाराष्ट्र गर्व्हमेंट नर्सेस असोसिएशनच्या वतीने अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील परिचारिकांनी एकदिवसीय कामबंद आंदोलन केले. या संपात जिल्ह्यातील सर्वच शासकीय रुग्णालयातील परिचारिका सहभागी झाले आहेत.

सेवावर्गातील सर्वंकष पदांची पदोन्नती मागील अनेक वर्षांपासून रखडलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने पाठ्यनिर्देशिका तसेच विभागीय परिसेविका, सार्वजनिक आरोग्य निर्देशिका, सहाय्यक अधिसेविका, अधिसेविका या पदांची देखील पदोन्नती रखडलेली आहे.

पदोन्नती या सेवाजेष्ठतेच्या आधारेच निकाली काढावी, अशी मागणी महाराष्ट्र गर्व्हमेंट नर्सेस असोसिएशनच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून करण्यात येत आहे. या पदोन्नतीच्या मागणीसाठी अनेक वेळा पत्रव्यवहार तसेच बैठकीद्वारे चर्चा करूनही मागणी प्रलंबितच असल्याने गुरूवारी महाराष्ट्र गर्व्हमेंट नर्सेस असोसिएशन च्या वतीने अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील परिचारिकांनी एकदिवसीय कामबंद आंदोलन पुकारले होते. या संपात जिल्ह्यातील सर्वच शासकीय रुग्णालयातील परिचारिका सहभागी झाल्या आहेत. यावेळी जिल्हा सामान्य रुग्णालयातील परिचारिकांनी एकत्र येत शासनाच्या विरोधात नारेबाजी केली. परिचारिका संपावर असल्याने शासकीय रुग्णालयाची धुरा ही कंत्राटी तत्वावर कार्यरत परिचारीका आणि नर्सिंग चे प्रशिक्षण घेत असलेल्या मुलींवर आल्याचे चित्र रुग्णालयात पहायला मिळाले.

### शासकीय रुग्णालयातील परिचारिकांचे निदर्शने

# आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती साजरी

**अमरावती** – आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती जिल्हा माहिती कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माहिती अधिकारी अपर्णा यावलकर, छायाचित्रकार सागर राणे, वरीष्ठ लिपिक योगेश गावंडे, लिपिक विजय राठोड, राजश्री चौरपगार आदी उपस्थित होते. उपस्थितांनी यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# विलास पाटील याचे निलंबन बेकायदेशीर!

## मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडून केले निलंबन आदेश रद्द



### काय म्हणाले न्यायालय!

न्यायालयाने सुनावणीमध्ये स्पष्ट केले की, याचिकाकर्ते हे कंत्राटी कर्मचारी असल्यामुळे संबंधित विभागाला त्यांना निलंबित करण्याचा अधिकार नाही. न्यायालयाने यावर आधारित, 8 सप्टेंबर 2022 चा निलंबन आदेश रद्द केला. न्या.अविनाश घरोटे व न्या.अभय मंत्री यांच्या न्यायपिठाने ही याचिका मंजूर केली. न्यायालयाने सांगितले की, कंत्राटी कर्मचारी असलेल्या याचिकाकर्त्याच्या निलंबनाचा आदेश राज्य सरकारच्या धोरणानुसार बेकायदेशीर होता. याचीकाकर्त्याची बाजू नागपूरचे प्रसिद्ध वकील अ‍ॅड. अभिनव पन्नासे यांनी मांडली.याचिका मंजूर करत न्यायालयाने कंत्राटी कर्मचार्यांच्या सुरक्षेसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )**– वरुड पंचायत समितीमध्ये सन 2021 पासून सहाय्यक कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत असलेले विलास पाटील यांचेवर एका वृत्तपत्राचे काम करत असल्याचा ठपका ठेवून जिल्हा परिषद प्रशासनाने त्यांचे निलंबन केले होते. त्यामूळे पाटील यांनी या कार्यवाहीविरोधात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल दाद मागितली होती. 17 फेब्रुवारी 2025 रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याप्रकरणी महत्त्वपूर्ण निर्णय देत हे निलंबन बेकायदेशीर असल्याचे सांगत जिल्हा परिषद प्रशासनाने दिलेले हे आदेशच रद्द केले. त्यामूळे याचिकाकर्ता विलास पाटील यांना दिलासा मिळाला आहे.

विलास पाटील हे वरुड पंचायत समितीमध्ये 1 जानेवारी 2021 रोजी ई–गव्हर्नन्स सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून कंत्राटी कर्मचारी नियुक्त झाले होते. त्यांना सहायक कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले होते. जामगाव खडका येथील माजी सरपंच मनोज पेलागडे यांनी विलास पाटील हे वृत्तपत्राचे काम करत असल्याची तक्रार जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी (सिईओ) अविशांत पंडा यांच्याकडे केली होती. या तक्रारीच्या आधारावर सिईओ पंडा यांनी विलास पाटील यांना वरुड पंचायत समितीचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी या पदावरुन निलंबित केले.

तसे लेखी आदेश त्यांनी दिले होते. ज्यामध्ये वृत्तपत्राचे काम करीत असल्यामुळे विलास पाटील यांना निलंबित करण्यात येत असल्याचे नमूद केले होते. वास्तवात राज्य सरकारच्या 25 ऑगस्ट 2021 च्या शासन निर्णयानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचा अधिकार प्रशासकीय अधिकाऱ्यांना नाहीच. भ्रष्टाचारासारख्या गंभीर प्रकरणात प्रशासकीय अधिकाऱ्याला कंत्राटी कर्मचाऱ्याच्या कारवाईचा तसा अहवाल राज्य शासनाला सादर करावा लागतो, त्यानंतर राज्य शासनाकडून कंत्राटी कर्मचाऱ्यांवर निलंबन किंवा सेवा समाप्तीची कार्यवाही केली जावू शकते. असे काहीच नसताना क्षुल्लक तक्रारीच्या आधारे तत्कालीन सिईओ अविशांत पंडा यांनी विलास पाटील यांच्या निलंबनाचे बेकायदेशीर प्रशासकीय आदेश काढले होते. या आदेशाविरुध्द उच्च न्यायालयात दाद मागितल्यावर न्यायालयाने ते निलंबन अवैध ठरवून निलंबन आदेश रद्द केले. त्यामुळे आता सहाय्यक कार्यक्रम अधिकारी विलास पाटील यांचा पुढचा मार्ग मोकळा झाला आहे.

# अस्मिता

## गरमागरम पोडी इडली

इडली हा झटपट होणारा पदार्थ. आज घराघरात इडली बनते. सर्वसाधारणपणे इडली चटणी किंवा इडली सांबार खाल्लं जातं. पण एखाद्या दिवशी बदल म्हणून पोडी इडली बनवू शकता. हा सकाळच्या गडबडीत पटकन होणारा पदार्थ आहे.

**रसगंधा**



**साहित्य :** छोट्या आकाराच्या दहा इडल्या, दोन चमचे शेंगदाणे, दोन मोठे चमचे चणाडाळ, एक मोठा चमचा उडिद डाळ, दोन ते तीन सुक्या लाल मिर्च्या, दोन छोटे चमचे तीळ, दोन छोटे चमचे किसलेलं सुकं खोबरं, अर्धा चमचा जीरं, कढीपत्त्याची सहा-सात पानं, चवीनुसार मीठ आणि तूप

**कृती :** एका कढईत दाणे, लाल मिरची, चणा डाळ, उडीद डाळ, तीळ, सुकं खोबरं, जीरं आणि कढीपत्त्याची पानं घालून मंद आचेवर भाजून घ्या. त्यानंतर गॅस बंद करा. हे पदार्थ थंड झाल्यावर मिक्सरमधून बारीक वाटून घ्या. वाटताना चवीनुसार मीठ घाला. तुमचा पोडी मसाला तयार आहे. आता कढईत थोडं तूप गरम करा. यात इडल्या घालून परतून घ्या. आता या इडलीवर पोडी मसाला भुरभुरा. चमच्याने नीट हलवून घ्या. पोडी इडली तयार आहे.

✦✦✦

## घालमेल कशी थांबवू?

तीन वर्षांपूर्वी माझं लग्न झालं. माझा नवरा महिन्यातले २५ दिवस कामासाठी बाहेर असतो. यामुळे मला खूप एकटं वाटतं. आमच्यातला संवाद खूपच कमी झाला आहे. तो बाहेर गेल्यावर रोज फक्त १०-१५ मिनिटं बोलणं होतं. यामुळे माझी चिडचिड होते. पण त्याच्यावर कामाचा खूप ताण असल्यामुळे तक्रारींची भर पडू नये, असं वाटतं. मी काय करू?

**काय करू?**

- वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याचं संतुलन साधण्याची कला प्रत्येकाला जमायला हवी. पण अनेकदा असं संतुलन साधणं कठीण होतं आणि एकच बाजू वरचढ ठरते. पण नात्याला आकार देण्यासाठी एकमेकांसोबत चांगला वेळ घालवणंही गरजेचं आहे. तू पतीला समजून घेऊन परिस्थितीला योग्य पद्धतीने सामोरं जात आहेस. पण तुझी घालमेल पतीला सांगणंही गरजेचं आहे. तुझ्या भावना त्याच्यापर्यंत पोहोचल्याच नाही तर तो स्वत:मध्ये सुधारणा कशी करणार? प्रत्यक्ष बोलायला वेळ नसेल तर तू त्याला मेसेज कर, मेल पाठव. तो परतल्यावर लंच किंवा डिनरच्या निमित्ताने एखाद्या निवांत ठिकाणी जाऊन मोकळ्या गप्पा मारण्याचा बेतही ठरवू शकतेस. बघ, कोणता मार्ग प्रशस्त वाटतो ते...



✦✦✦



## पगारवाढ हवी आहे?

नोकरी म्हटली की पगारवाढ आलीच. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कौशल्यांनुसार, क्षमतेनुसार बढती दिली जाते. ठराविक काळानंतर पगारवाढही होते. पण २०१५ च्या एका सर्वेक्षणानुसार ५७ टक्के नोकरदार महिला पगारवाढीसाठी विचारणाच करत नाहीत. पगारवाढ मिळवण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

✻ कंपनीच्या प्रगतीत तुम्ही दिलेल्या योगदानाचा विचार करा. कामाचा दर्जा आणि प्रमाण यांचा ताळमेळ बसवताना अचूकता महत्त्वाची आहे हे लक्षात घ्या.

✻ स्वत:मधली कौशल्यं ओळखा. त्यांची यादी करा. तांत्रिकच नाही तर कामाशी संबंधित इतर कौशल्यंही महत्त्वाची ठरतात. तुमची समर्पक वृत्ती, वेळेत कामं संपवणं, कामाप्रतीची निष्ठा या गोष्टीही महत्त्वाच्या आहेत हे लक्षात ठेवा. आपलं पद, हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलेलं प्रशिक्षण या बाबींचा विचार करा. पगारवाढीबाबत वाटाघाटी करताना आत्मविश्वास दिसू द्या.

**स्कील डेव्हलपमेंट**

✻ एक कर्मचारी म्हणून स्वत:चं मूल्य जाणून घ्या. पगारवाढीबाबत वरिष्ठांशी चर्चा करण्याआधी बाजारपेठेचा अभ्यास करा. तुमच्या पदावर असणाऱ्यांना किती पगार मिळतो हे जाणून घ्या. त्यानुसार वरिष्ठांशी बोला. आपल्याला किती पगारवाढ हवी याचा निश्चित आकडा आपल्याकडे असायला हवा. तसं नसेल तर आपल्याला वरिष्ठांनी दिलेली पगारवाढ मान्य करावी लागेल.

✻ वरिष्ठांशी वाटाघाटी करण्याआधी पूर्ण तयारी करा. अन्यथा, तुम्ही गोंधळून जाल.

✻ तुम्ही पगारवाढीसाठी वाटाघाटी करत आहात हे लक्षात ठेवा. वरिष्ठ आकडा कमी करण्याचा प्रयत्न करणार. कोणीही पहिल्याच प्रयत्नात भरपूर पगारवाढ देणार नाही. त्यामुळे सुरूवात मोठ्या आकड्याने करा. वाटाघाटींदरम्यान हा आकडा खाली येणार आहे हे लक्षात ठेवा.



**पत्रकार असणाऱ्या सोनल रोचानी यांना समाजासाठी काही तरी करायचं होतं. वंचित, दुर्बल घटकांना त्यांचे हक्क मिळवून द्यायचे होते. कामाच्या निमित्ताने फिरताना त्यांना समाजातल्या विविध घटकांमधली आर्थिक दरी दिसत होती. पण कामाची सुरूवात काही केल्या होत नव्हती. पण एका घटनेने त्यांचं आयुष्यच बदलून टाकलं आणि आदिवासी समाजातल्या महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले.**

सोनल रोचानी यांना फक्त पत्रकारितेच्या क्षेत्रापुरतं मर्यादित रहायचं नव्हतं. पत्रकारितेच्या पलीकडे जाऊन समाजातल्या वंचित, दुर्बल घटकांना मदत करण्याची त्यांची इच्छा होती. सोनल सूरतमध्ये पत्रकार म्हणून कार्यरत होत्या. त्यांना कामानिमित्ताने बरंच हिंडावं लागायचं. या दरम्यान त्यांनी समाजातला विरोधाभास अनुभवला. पण हळहळ व्यक्त करण्याशिवाय त्या दुसरं काही करू शकत नव्हत्या. पण २००५ मधल्या एका घटनेने त्या खूप हादरल्या. या घटनेने त्यांच्या आयुष्याला कलाटणी दिली. त्या बातम्या मिळवण्यासाठी जिल्हा रुग्णालयात जायच्या. असंच एके दिवशी रुग्णालयात आलेल्या एका महिलेने त्यांच्याकडे मदत मागितली. सासरच्यांनी त्या गरोदर महिलेच्या अंगावर रॉकेल ओतलं होतं. पोटातल्या

## आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने..

बाळाचं लिंग कळल्यामुळे ते तिला पेटवून देण्याच्या तयारीत होते. सोनल आणि इतरांनी या महिलेला मदत केली. पण महिला सक्षमीकरणासाठी आपण आणखी काही तरी करायला हवं, याची जाणीव त्यांना झाली. ग्रामीण भागातल्या महिलांच्या परिस्थितीबाबत त्यांनी संशोधन केलं. मर्यादित स्रोतांमुळे या महिला मागे पडत असल्याचं त्यांच्या लक्षात आलं.

**मानिनी**



सोनल यांच्या कार्याचं बीज तिथेच रोवलं गेलं. मग जवळपास पाच वर्षांच्या प्रयत्नांनंतर नोकरी सोडून समाजकार्याकडे वळण्याचं धाडस सोनल यांनी दाखवलं. त्यांनी आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणाच्या कामाला वाहून घ्यायचं ठरवलं. काही काळ जागतिक बँकेसोबत काम केलं. विविध सामाजिक कार्यांसाठी देण्यात येणाऱ्या निधीच्या वाटपाचा अभ्यास केला. जागरूकतेच्या अभावामुळे ग्रामीण भागातल्या लोकांना सरकारी योजनांचे लाभ मिळत नसल्याची बाब त्यांच्या लक्षात आली. ग्रामीण भागातल्या महिला आणि मुलांसाठी असणाऱ्या सरकारी योजनांचे लाभ त्यांना मिळवून देण्यासाठी सोनल यांनी २०११ मध्ये शक्ती फाउंडेशन या सेवाभावी संस्थेची स्थापना केली.

सामाजिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी त्या संपूर्ण गुजरात राज्यात फिरल्या. त्यानंतर त्यांनी सुरत आणि तापी परिसरातल्या हलपाती आणि कोटद्वारा या आदिवासी समाजांसाठी काम करायचं ठरवलं. या समाजांमधले पुरुष दारूच्या आहारी गेले होते. त्यामुळे त्यांचं आयुष्य खूप कमी झालं होतं तर वनसंपदा कमी झाल्यामुळे कोटद्वारा समाजाचा बांबूपासून हस्तकलेच्या वस्तू घडवण्याचा पारंपरिक व्यवसाय धोक्यात आला होता. त्यामुळे या दोन्ही समाजांची स्थिती अत्यंत हलाखीची होती. सोनल आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी बरेच प्रयत्न केले. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता अशा विविध क्षेत्रांमध्ये काम केलं. आज तब्बल आठ वर्षांनंतर शक्ती फाउंडेशनने ५५ गावांमधल्या जवळपास पाच हजार आदिवासी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केलं आहे. स्वत:चे व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांना संस्थेतर्फे प्रशिक्षण आणि मदत देण्यात आली आहे. आता त्याची गोड फळं चाखायला मिळत आहेत. आता संस्थेला आपलं कार्य राज्यभर पोहोचवायचं आहे. सोनल यांनी अनेक महिलांचं आयुष्य पूर्णपणे बदलून टाकलं आहे.

✦✦✦

## फ्रीजमध्ये काय ठेऊ नये?

बाजारातून आणलेल्या फळं, भाज्या आपण थेट फ्रीजमध्ये ठेवतो. यासोबतच घरातले उरलेसुरले पदार्थही फ्रीजमध्येच जातात. मात्र काही पदार्थ फ्रीजमध्ये ठेवल्याने त्यांची गुणवत्ता, चव बिघडते. शिवाय असे पदार्थ आरोग्यासाठीही घातक ठरू शकतात. कोणते पदार्थ फ्रीजमध्ये ठेवणं अयोग्य ठरतं? जाणून घेऊ.

**हेल्थ टॉक**



✻ टोमॅटो फ्रीजमध्ये ठेऊ नयेत. त्यात पाणी कमी असल्यामुळे थंड वातावरणात ते लवकर खराब होतात. फ्रीजमधल्या टोमॅटोंचा रंगही बदलतो. अशा टोमॅटोंचं सेवन घातक ठरू शकतं.

✻ पाव, ब्रेड असे पदार्थ फ्रीजमध्ये ठेऊ नयेत. फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर ब्रेड कोरडा पडतो. त्याची चव बदलते.

✻ फ्रीजमधल्या थंड वातावरणामुळे बटाट्यातल्या स्टार्चचं रुपांतर साखरेत होतं. यामुळे पोटाच्या समस्या निर्माण होतात.

✻ फ्रीजमधल्या मधात खडे तयार होतात. तसंच हे मध गोठून जातं. त्यामुळे मधाची बाटली सर्वसामान्य तापमानातच ठेवावी.

✻ थंडगार कलिंगड खूप छान लागतं. पण फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर कलिंगडातले पोषक घटक नष्ट होतात.

✻ कॉफी फ्रीजमध्ये ठेऊ नये. यामुळे कॉफीचा ताजेपणा नष्ट होतो. कॉफी फ्रीजमधले विविध प्रकारचे गंध शोषून घेते. याचा आरोग्यावर परिणाम होतो.

✻ सोया सॉस, टोमॅटो केचप असे पदार्थ फ्रीजमध्ये ठेवण्याची गरज नसते.

✻ लिंबू, संत्र्यासारखी आंबट फळंही फ्रीजमध्ये खराब होतात. त्यांच्या सालांवर डाग पडतात आणि रसही आटतो.

✦✦✦

## रोज खा भात



भारतामध्ये विविध खाद्यसंस्कृती अस्तित्वात असल्या तरी भात हा त्यातील समान धागा आहे. भारताच्या बहुतेक सर्व भागांमध्ये तांदळापासून बनवलेल्या विविध पाककृती आहाराचा बहुतांश भाग व्यापतात. एकंदरच भात हे भारतीयांचं आवडीचं अन्न आहे असं म्हणायला हवं. एकीकडे भातामुळे वजन वाढतं, जाडी वाढते, रक्तातील शर्करा वाढते असे समज भीती वाढवत राहतात. पण हे गैरसमजच असल्याचं तज्ज्ञ सांगतात. तांदळाच्या विविध जातींमध्ये व्हिटॅमिन्स आणि मिनरल्सचा उत्तम स्रोत असतो. तांदळामध्ये व्हिटॅमिन डी, कॅल्शियम, फायबर, थायमीन, लोह आदी आवश्यक घटकांची उत्तम मात्रा असते. म्हणूनच हे लाभ मिळवण्यासाठी दररोजच्या आहारात भात असावा.

**डाएट मंत्रा**

पोट खराब असल्यास, जुलाब, उलट्या होत असल्यास तांदूळ आणि मुगाची डाळ एकत्र करुन तयार केलेली खिचडी खावी. ही खिचडी पचायला हलकी असते. त्याचप्रमाणे तांदळातील पौष्टिक घटकांमुळे पचनक्रिया सुरळीत होण्यास मदत होते.

✻ व्हाईट राईसऐवजी ब्राऊन राईसला प्राधान्य द्यावं. हा तांदूळ मधूमेहींसाठी विशेष उपकारक ठरतो. मात्र अस्थमा असणाऱ्यांनी हा तांदूळ वापरू नये. कारण या तांदळाची प्रकृती थंड आहे. या तांदळाचा भात खाल्ल्यास दम्याचा त्रास वाढू शकतो.

✻ दररोज भात खाल्ल्याने शरीराची कार्बोहाईड्रेटची गरज भागते. या घटकामुळे मेंदूचे कार्य सुरळीत रहाते. भातामुळे शरीराची कार्यक्षमताही टिकून राहाते.

✻ उच्च रक्तदाबाचा त्रास असणाऱ्या महिलांनी रोजच्या आहारात एक वाटी भात ठेवायलाच हवा. तांदळामध्ये सोडियमची मात्रा नसते. त्यामुळे हृदयविकाराचा धोका दूर रहातो.

✻ तांदळामध्ये नाममात्र स्वरूपात कोलेस्टेरॉल असतं. तुम्ही कोलेस्टेरॉल फ्री राईसही वापरू शकता. यामुळे जाडी वाढण्याचा धोका संपतो.

✻ ब्राऊन राईसमध्ये शरीरात विरघळणाऱ्या फायबरची पर्याप्त मात्रा असते. ही बाब कॅन्सरचा धोका दूर ठेवण्यास पूरक ठरते.

✻ भाताची पेजही लाभकारक आहे. इतकंच नव्हे तर, तांदूळ शिजवलेल्या पाण्याने चेहरा धुतल्यास त्वचारोग दूर होतात. त्याप्रमाणे सुरकुत्यांपासून मुक्ती मिळते.

✻ दररोजच्या आहारात भात असेल तर अल्झायमरचा धोका टळतो असं तज्ज्ञ सांगतात.

✦✦✦

## चलती रंगीबेरंगी मस्काराची

डोळ्यांचं सौंदर्य खुलवण्यासाठी काजळ, लायनर, आयशॅडो, मस्कारा यांचा वापर होतो. बोल्ड लूकसाठी रंगीबेरंगी मस्कारा ट्राय करता येतो. डोळ्यांच्या रंगानुसार त्याची निवड करा.

**ब्युटी टॉक**

✻ काळ्यापेक्षा काही वेगळं ट्राय करायचं असेल तर ब्राउन मस्कारा लावा. ब्राउन मस्कारा तुम्हाला नॅचरल लूक देतो. हा मस्कारा पार्टी किंवा समारंभाला जाताना लावता येईल. ऑफिसमध्येही तुम्ही तो ट्राय करू शकता. ब्राउन रंगाचे डोळे असतील तर हा मस्कारा ट्राय करा. ✻ हिरवट रंगाचे डोळे असणाऱ्यांनी निळ्या रंगाचा मस्कारा लावायला हरकत नाही. निळ्या रंगातल्या विविध शेड्स ट्राय करता येतील. निळा रंग रात्रीपेक्षा सकाळी उठून दिसतो. हटके लूकसाठी गोल्डन मस्कारा ट्राय करा. ✻ डार्क ब्राउन रंगाच्या डोळ्यांसाठी मस्काराच्या हिरव्या शेड ट्राय करा.

✻ डोळ्यांचा आकार मोठा भासवायचा असेल तर पर्पल मस्कारा लावा. सावळ्या वर्णाच्या महिलांवर पर्पल तर गोऱ्या वर्णाच्या महिलांवर व्हायोलेट शेड उठून दिसेल.



✦✦✦

**स्मार्ट टिप्स**

### टाचांना भेगा आहेत?

टाचांना भेगा पडणं ही अनेकींची समस्या असते. मात्र वेळीच लक्ष दिलं नाही तर ही समस्या गंभीर रुप धारण करते. टाचांच्या भेगांमुळे स्किन इंफेक्शनचा धोका संभवतो. मधुमेहींना हा धोका अधिक गांभीर्यानं जाणवतो. म्हणूनच यावर वेळीच उपाय करायला हवा. घरच्या घरी देखील टाचेच्या भेगांवर परिणामकारक उपाय होऊ शकतो. यासाठी बेकिंग सोडा आणि दूध हे मिश्रण वापरावं. दूध हे नैसर्गिक मॉइश्चरायझर आहे. दुधामुळे त्वचा मऊ मुलायम बनते. दुधाऐवजी मिल्क पावडरचाही वापर करता येतो. दोन कप दुधामध्ये एक चमचा बेकिंग पावडर मिसळावी आणि यात पाय बुडवून ठेवावेत. यामुळे पायाच्या भेगा कमी होतीलच त्याचप्रमाणे टॅनिंगही निघून जाईल.



**लक्षात असावे**

### दरवळत रहा...

डिओचा सुगंध दिवसभर टिकवून ठेवायचा असेल तर काही टिप्स फॉलो कराव्या लागतील. ओल्या अंगावर डिओ फवारल्याने त्याचा सुगंध फार काळ टिकत नाही. त्यामुळे आंघोळीनंतर लगेच डिओ फवारू नका. अंग कोरडं करून मगच वापरा. ङ्गशेक बीफोर युजफ या सूचनेचं पालन करा. यामुळे डिओतले सर्व घटक एकजीव होऊन चांगल्या प्रकारे काम करतात आणि शरीराची जळजळ होत नाही. बाटली शरीरापासून १५ सेंटीमीटर लांब ठेऊन डिओ फवारा. डिओ कपड्यांवर फवारू नका.



**किचन टिप्स**

### अशी चमकवा काळी भांडी

सततच्या वापरामुळे कढई आणि भांडी काळी पडतात. पदार्थ करपल्यामुळेही भांड्यांचा तळ काळपट दिसू लागतो. या काळ्या भांड्यांचा वापर नकोसा वाटतो. मात्र काही उपायांद्वारे तुम्ही भांड्यांचा काळपटपणा सहज दूर करू शकता. काळपट कढईत एक चमचा बेकिंग सोडा घालून त्यात दोन चमचे लिंबाचा रस आणि दोन कप पाणी घाला. स्टीलच्या स्क्रबरने कढई घासून स्वच्छ करा. काळपटपणा निघून जाईल. टोमॅटोच्या रसानेही काळपट भांडी स्वच्छ होतील. काळ्या पडलेल्या भांड्यांमध्ये टोमॅटोचा रस आणि पाणी घालून उकळून घ्या. यानंतर स्क्रबरने घासून स्वच्छ करा.



## जपा केसांचे आरोग्य

थंडीत केसांची विशेष काळजी घ्यावी लागते. थंड वातावरण केस कोरडे होणं, त्वचा खाजणं, कोंड्याची समस्या वाढणं आदी त्रास संभवतो. म्हणूनच या दिवसात आहारात काही महत्त्वपूर्ण घटकांचा समावेश करुन केसांचं आरोग्य अबाधित राखण्याचा प्रयत्न करायला हवा. थंडीत केसांच्या समस्या वाढतात हा अनेकींचा अनुभव असेल. म्हणूनच या दिवसांत केसांकडे विशेष लक्ष द्यायला हवं. केसगळती पर्यायाने सौंदर्याच्या हानी रोखायची असल्यास काही टिप्स लक्षात घ्यायला हव्या.



✻ केसांना प्रथिनं अत्यावश्यक असतात. ती पुरेशा प्रमाणात मिळाली नाहीत तर लोहाची कमतरता निर्माण होऊन केस गळू लागतात. म्हणून आहारात कडधान्ये, डाळी, मसूर, सोयाबीन, वाटाणे यांसारखे पदार्थ असावेत.

✻ दही, दूध, चीज यांचं पुरेसं प्रमाण असेल तर योग्य प्रमाणात कॅल्शियम आणि ड जीवनसत्त्व मिळून केसांची मुळं पक्की होतात.

✻ फळं आणि भाज्या, हिरव्या पालेभाज्या, पिवळ्या आणि नारिंगी रंगांची फळं यांमधून अ तसेच क जीवनसत्त्वं मिळून टाळूला तेलनिर्मिती करण्यास मदत होते.

✻ मीठ आणि साखर अति प्रमाणात खाल्लं जात असेल तर डोक्यावरची त्वचा लाल होऊन खाज सुटते. कोंडा वाढतो. म्हणून हे पदार्थ टाळले पाहिजेत.

✻ रोज थोडे काजू खाल्ल्याने जस्त मिळतं आणि त्यामुळे केस तेजस्वी दिसतात.

✻ गाजर, रताळी, अक्रोड, बदाम यांचा आहारातील समावेशही केसांच्या वाढीला उपयुक्त ठरतो.

✦✦✦

